# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२४

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### कुर्डूवाडी बस स्थानकातील समस्यांबाबत

**(१) ४०३० (०९-०४-२०२०). श्री.राम सातपुते (माळशिरस) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुर्डूवाडी शहरात अपुऱ्या बसेस, चालक व वाहक यांची कमतरता व आगारातील रस्त्यावर पडलेले मोठमोठे खड्डे यांसह अनेक समस्या कुर्डूवाडी बस स्थानकाला भेडसावत असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्या आगारात गत तीन वर्षांपासून केवळ ५४ बसेस आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, १० नवीन बसेसची मागणी असूनही ती अद्याप पूर्ण झालेली नाही त्यामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे हेही खरे आहे काय,

(४) तसेच, १२९ चालकांपैकी ८ चालकांची पदे रिक्त असून वाहकांच्या ११८ पदांपैकी पैकी ९ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०४-२०२१) :** (१), (२), (३) व (४) कुर्डूवाडी आगारात तीन वर्षांपासून सरासरी ५६ बसेस उपलब्ध असून, २ नवीन बसेस देण्यात आलेल्या आहेत. तसेच, आगारातील चालक व वाहकांची २४६ पदे मंजुर असून, सद्यस्थितीत २४६ चालक व वाहक कार्यरत आहेत. कुर्डुवाडी आगारातील खड्डे हे खडी व मुरमाने वेळोवेळी बुजविण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सोलापूर शहरातील यंत्रमागधारक कारखानदारांच्या विविध समस्याबाबत.

**(२) ४७७६ (१६-०४-२०२०). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर येथील वीज ग्राहकांना पूर्वीच्या तुलनेत दुप्पट म्हणजे ६ रुपये प्रति युनिट वीज दर आकारले असल्याने असून या वीज दर वाढीमुळे त्यांना इतर राज्यांशी स्पर्धा करणे अवघड झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्व यंत्रमाग उद्योगाला डी प्लस दर्जा देण्यात यावा, एमआयडीसीतील बांधकामाचे मुद्रांक शुल्क माफ करणे, यंत्रमाग कामगारांसाठी यंत्रमाग कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना करावी अशा विविध मागण्या लोकप्रतिनिधींनी पालकमंत्री, सोलापूर यांच्याकडे दिनांक २६ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने सोलापूर येथील यंत्रमागधारकांची तातडीने बैठक घेऊन यंत्रमागधारकांच्या विविध मागण्या मान्य करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-१०-२०२१) :**(१) हे खरे नाही.

शासनामार्फत राज्यातील वस्त्रोद्योगांना वस्त्रोद्योग धोरण २०१८-२३ अंतर्गत वीजदरात सवलत देण्यात येत आहे. माहे जानेवारी, २०१९ पासून राज्यातील २७ अश्वशक्तीपेक्षा कमी विद्युत भार असलेल्या यंत्रमाग धारक ग्राहकांना रु. ३.७७ प्रति युनिट व २७ अश्वशक्ती पेक्षा जास्त विद्युत भार असलेल्या यंत्रमागधारक ग्राहकांना रु. ३.४० प्रति युनिट इतकी सवलत वीज दरात देण्यात येते.

सद्यस्थितीत २७ अश्वशक्तीपेक्षा कमी विद्युत भार असलेल्या यंत्रमाग धारक ग्राहकांना रु. ३.२३ प्रति युनिट तर २७ अश्वशक्तीपेक्षा जास्त विद्युत भार असलेल्या यंत्रमागधारक ग्राहकांना रु. ४.६७ प्रति युनिट प्रमाणे वीज दर आकारण्यात येत आहेत.

(२) व (३),

उद्योग विभागामार्फत सामुहिक प्रोत्साहन योजना-२०१९ अंतर्गत तालुक्याच्या औद्योगिक विकासाच्या आधारे अ,ब, क, ड व ड+ असे वर्गीकरण करुन मागास तालुक्यांना अधिक प्रोत्साहने देण्यात येतात.

औद्योगिक विकास महामंडळामार्फत (MIDC) दिर्घ मुदतीच्या भाडे करारावर वाटप केलेल्या भुखंडावर मुद्रांक अधिनियमांच्या तरतुदीप्रमाणे मुद्रांक शुल्क आकारण्यात येत असून, बांधकामावर कोणतेही मुद्रांक शुल्क आकारले जात नाही. तसेच, सामुहिक प्रोत्साहन योजना २०१९ अंतर्गत भुखंडासाठी मुद्रांक शुल्क माफी देण्यात येत आहे.

कामगार विभागामार्फत प्राप्त झालेल्या माहितीनुसार, शासन अधिसूचना दि.०३.०४.२०१८ अन्वये महाराष्ट्र सामाजिक सुरक्षा मंडळ गठीत करण्यात आले असून, त्याअंतर्गत ३०० व्यवसायांमध्ये यंत्रमाग कामगारांचा समावेश आहे. या मंडळामार्फत नोंदणीकृत असंघटीत कामगारांना केंद्र व राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यात येणार आहे. तसेच, मा. मंत्री (कामगार) महोदयांकडे दि.१८.०८.२०२१ रोजी झालेल्या बैठकीत यंत्रमाग कामगारांसाठी कल्याणकारी मंडळ स्थापन करण्यास तत्वत: मान्यता देण्यात आली आहे. सदर निर्णयाच्या अनुषंगाने कामगार विभागामार्फत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

असंघटीत कामगारांची नोंदणी करण्याकरिता दिनांक २६.०८.२०२१ पासून ई श्रम पोर्टलचे उद्घाटन करण्यात आले आहे. आतापर्यंत ई श्रम पोर्टलवर एकूण ११७८६ यंत्रमाग कामगारांनी नोंदणी केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**म्हाडाच्या भूखंडावरील महापालिकेच्या शाळांना देण्यात आलेल्या वर्गांचे आरक्षण कायम ठेवण्याबाबत**

**(३) ३७६८२ (१८-०४-२०२२). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडाच्या भूखंडावरील इमारतीच्या पुनर्विकासानंतर महापालिकेच्या शाळांना देण्यात आलेल्या वर्गांचे आरक्षण कायम ठेवण्याचा निर्णय मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, म्हाडाच्या भूखंडावरील किती महानगरपालिकेच्या शाळांचे आरक्षण कायम करुन त्यांना वर्गासाठी जागा देण्यात आल्या आहेत वा त्यानुषंगाने अंतिम कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(३) असल्यास निर्णय व त्यानुषंगाने कार्यवाहीची अंमलबजावणी करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे (१४-०२-२०२४) :** (१) व (२) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत कोणत्याही भूखंडांचे वितरण करण्यात येत नाही. विकास आराखडयानुसार महानगरपालिकेच्या शाळांकरिता आरक्षित असलेले मुंबई मंडळाच्या अभिन्यासातील भूखंड महानगरपालिकेस हस्तांतरित करण्यात येतात. त्यामुळे महानगरपालिकेच्या शाळांचे आरक्षण भूखंडावर कायम असते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### म्हाडाच्या २० हजार घरांचे हस्तांतरण प्रलंबित असल्याबाबत

**(४) ३८०२५ (१८-०४-२०२२). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई इमारत दुरुस्ती व पुर्नरचना मंडळाअंर्तगत सन २०१३ पूर्वीच्या पुर्नरचीत इमारतीमधील घरांची विक्री मालकाने दुसऱ्याला केली असली तरी खरेदीदाराला हस्तांतरण व नियमितीकरण करता यावे म्हणून सदरच्या व्यवहारावर लागणारे मुद्रांक शुल्क माफ करण्याचा निर्णय मुंबई इमारत दुरस्ती व पुर्नरचना मंडळाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याकरीता असलेली अभय योजना आणावी असा प्रस्ताव म्हाडाच्या वतीने राज्य शासनाकडे मंजुरीसाठी पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावावर शासनाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (१४-०२-२०२४) :** (१), (२) व (३) मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई अंतर्गत येणाऱ्या इमारतीमधील गाळयांचे दि.२८.०८.२०१३ पुर्वीच्या प्रकरणी हस्तांतरण/नियमितीकरण करताना अंतिम हस्तांतरण/नियमितीकरण करताना शेवटच्या हस्तांतरणावर मुद्रांक शुल्क आकारून एकतर्फी नोंदणीकरण करण्यासाठी अभय योजना राबविण्याबाबत प्रस्ताव प्राप्त झाला आहे. सदरहू प्रस्ताव विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबईतील उपकर प्राप्त धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासाबाबत

**(५) ३९६२४ (१०-०४-२०२२). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सी.टी.एस.नं. १८१ आणि १८६, परेल-शिवडी विभाग जे.जे.रोड शिवडी के.के.मोदी चाळ २. सी.टी.एस.नं. १६१ आणि १/१८१ परेल-शिवडी विभाग, डी.एस.ठोकरसी जिवराज रोड, एफ/साउथ वॉर्ड, मुंबई हिराजी गोविंदजी चाळ३. सी.टी.एस. २२९९ भुलेश्वर विभाग केस (४५५१-५२ आणि ४५५४ ४५६०-४५५९ (२) आणि सी ४५६१ १४ १८ए १८सी १८ए भास्कर लेन, मुंबई ४. सी.एस.नं. १/२२९९ आणि २३११ भुवनेश्वर भुवन इमारत क्र. २४ सेस नं ४५५५ आणि सी५०३५ कुंभार टुकडी लेन, मुंबई या उपकर प्राप्त इमारतींना पुनर्विकास ना हरकत प्रमाणपत्र प्रदान केले आहे हे खरे आहे काय,

(२) तसेच अनुक्रमे १. ०.६.१९९६, २. २१.१२.२०९६ ३.१६.८.२०१४ ४. ११.११.२०१३ ना हरकत प्रमाणपत्र प्रदान केले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास सदर इमारती जागेवरच असून धोकादायक झाल्या आहेत तसेच यापैकी एकही इमारत २५ वर्षापासून तोडण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(४) सदर भुखंडाचे विकासक व जमिनीचे मालक यांचेकडून सदर भुखंड म्हाडा ताब्यात घेऊन पुनर्विकास करण्याचे आदेश देणार आहेत काय,

तसेच अशा विकासक व भुखंड मालकांवर कारवाई करण्याचे आदेश म्हाडा प्रशासनाने अथवा शासनाने दिले आहेत काय,

(५) असल्यास, सदर भुखंड म्हाडाने ताब्यात घेऊन पुनर्विकास करण्याबाबत कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (१४-०२-२०२४) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३)
१.भुकर पाहणी क्र.१८१ व १८६ परळ शिवडी विभाग :-
सदर मालत्तेवरील ०२ उपकरप्राप्त इमारती विकासकाने सन १९९८ मध्ये तोडल्या असुन त्यामधील एकूण १३२ भाडेकरु/रहिवाशांपैकी ६० भाडेकरु /रहिवाश्यांना त्याच मालमत्तेवर विकासकाने बांधलेल्या तात्पुरत्या संक्रमण शिबिरामध्ये स्थलांतरीत केले आहे व उर्वरीत भाडेकरु/रहिवाशी हे मंडळाच्या संक्रमण शिबिरात वास्तव्यास आहेत.
२. भुकर पाहणी क्र.१६१ व १/१६१ परळ शिवडी विभाग :-
सदर मालमत्तेवर ०४ उपकरप्राप्त चाळी होत्या त्यापैकी चाळ क्र.१ ही धोकादायक असल्यामुळे तळ मजल्यापर्यंत तोडण्यात आलेली आहे. तसेच चाळ क्र.२,३ व ४ हया जागेवर अस्तित्वात असून ना-हरकत प्रमाणपत्रधारकाने या चाळींची दुरुस्ती केली आहे.
३. भुकर पाहणी क्र.२२९९ भुलेश्वर विभाग :-
सदर मालमत्तेवर ०३ उपकरप्राप्त इमारती व ०२ बिगर उपकरप्राप्त इमारती होत्या त्यापैकी ना-हरकत प्रमाणपत्र धारकाने ०२ उपकरप्राप्त इमारती व ०२ बिगर उपकरप्राप्त इमारती तोडल्या असून त्या ठिकाणी पुनर्वसन + विक्रीयुक्त इमारतींच्या जोत्याचे काम सुरु केले आहे. उर्वरीत ०१ उपकरप्राप्त इमारत जागेवर अस्तित्वात असून धोकादायक स्थितीत आहे.
४. भुकर पाहणी क्र.१/२२९९ आणि २३११ भुलेश्वर विभाग:-
सदर मालमत्तेवर ०१ उपकरप्राप्त इमारत होती व सदर इमारत ही धोकादायक झाल्याने ना-हरकत प्रमाणपत्र धारकाने तोडली असून त्यामधील भाडेकरु/रहिवाश्यांना पर्यायी जागेसाठी भाडे देऊन स्थलांतर केले आहे.
(४) व (५)
विकास नियंत्रण नियमावली ३३(७) अन्वये अर्धवट अवस्थेत सोडलेले पुनर्विकास प्रकल्प पूर्ण करण्याबाबत दि.०२.१२.२०२२ रोजी म्हाड अधिनियम १९७६ मध्ये सुधारणा करुन नविन कलम ९१(अ) अंतर्भुत केले आहे. ना-हरकत प्रमाणपत्र धारक / विकासकाने लवकरात लवकर पुनर्विकासाचे काम सुरु केले नाही तर उपरोक्त तरतुदीनुसार पुढील कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

---

## मुंबईत काही ठिकाणी बॉबस्फोट करण्याबाबत धमकीचा इमेल आल्याबाबत

**(६) ४०२७३ (१२-०४-२०२२). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील शाळा, महाविद्यालये आणि रेल्वे स्थानकांत बॉबस्फोट करण्याबाबतचा धमकीचा इमेल आल्याने ठाणे नगर पोलिस स्थानकांत दिनांक २३ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास गुन्हा नोंदविण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०२-२०२४) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) व (३)
ठाणे पोलीस स्कुल मधील शिक्षिका श्रीमती फरहाना मोहसीन शेख या दैनदिन कामकाजा प्रमाणे ठाणे पोलीस स्कुल मधील thanepoliceschool@gaet.edu.in या ईमेल आयडीवरील मेल्स चेक करीत असताना आरोपी Lashkar-२९ (lashkar२२@protonmail.com) या ईमेल धारकाने स्कुल, कॉलेज व रेल्वे स्टेशन हे बॉबने उडविण्याची धमकी दिली बाबत दिसुन आले.म्हणुन नमुद शिक्षिका यांनी दिलेल्या तक्रारी वरून ठाणेनगर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि.नं.१७/२०२२ भा.दं.वि. ५०५,५०७ व माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० चे कलम ६६ (फ) प्रमाणे दिनांक २२ जानेवारी २०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचा तपास सुरू असुन प्राथमिक तपासामध्ये आरोपीने ज्या ईमेल आयडीवरून धमकी दिली तो प्रोटॉनमेल असुन त्याचा सर्व्हर स्वित्झरलँड या देशात आहे. सदर बाबत सायबर पोलीस मार्फत स्वित्झरलॅन्ड सरकारला सदर मेलचा आयपी अँड्रेस आणि प्रोफाईल डिटेल याबाबत माहिती मिळण्यासाठी विनंती केली असता त्यांनी सदरची विनंती ही इंटरपोल मार्फत अथवा युरोपोल नॅशनल ब्युरो मार्फतीने सादर करणेबाबत सांगितले आहे. तसेच पुणे सिआयडी मार्फतीने इंटरपोल माध्यमाने इन्फॉरमेल लेटरव्दारे नमुद देशाला आरोपीताचा आयपी अ‍ॅड्रेस व इतर माहिती मिळणेबाबतचा प्रस्ताव योग्य मार्फतीने पाठविण्यात आला आहे. तसेच MLAT प्रपोझलची कार्यवाही सुरू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्ह्यातील राजीव गांधी आवास योजनेंतर्गत मंजूर घरकुल लाभार्थींना व्याजाची प्रतिपुर्ती रक्कम मिळण्याबाबत

**(७) ४०८४९ (१०-०४-२०२२). श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजुरा, गोंडपिपरी, कोरपना (जि.चंद्रपूर) व इतरही तालुक्यातील सुधारित राजीव गांधी आवास योजना क्रं-२ मधील लाभार्थींना शासनाकडून मिळणारी व्याजाची प्रतिपुर्ती रक्कम लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा झाली नसतांना बॅंका लाभार्थींच्या खात्यातील बचत म्हणून असलेले पैसे बेकायदेशीररित्या कपात करीत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास चंद्रपूर जिल्ह्यातील लाभार्थींच्या खात्यात व्याजाची प्रतिपुर्ती रक्कम जमा करणेबाबत जिल्हा ग्रामीण विकास योजना (जिग्रावियं) चंद्रपूर यांनी मागणी करुनही म्हाडा ने व्याजाची रक्कम उपलब्ध करुन दिली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सुधारित राजीव गांधी आवास योजना क्रं-२ अंतर्गत मंजूर लाभार्थींना व्याजाची रक्कम उपलब्ध करुन देणेबाबत मा.स्थानिक लोकप्रतिनिधींनी यांनी माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (१२-०२-२०२४) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) होय, हे खरे आहे.
(४) याबाबत एकूण २६५ मंजूर लाभार्थींच्या कर्ज प्रकरणावरील व्याजाच्या अदायगी तात्काळ करण्याबाबत संबंधित क्षेत्रीय कार्यालयास शासन स्तरावरून कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील शिवडी येथील टी. जे. रोडवर उपकरप्राप्त के. के. मोदी वाणी चाळीतील रहिवाश्यांची विकासकाकडुन झालेली फसवणूक

**(८) ४१०४७ (२८-०३-२०२२). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील शिवडी येथील टी. जे. रोडवर उपकरप्राप्त के. के. मोदी वाणी चाळ १०० वर्षाहून अधिक जुनी आहे हे खरे आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर चाळीचा पुनर्विकास करण्यात येत असून गेली २८ वर्षे स्थानिक रहिवाशी संक्रमण शिबिरात राहत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर जागी पुनर्विकास करण्यासाठी नेमलेल्या विकासकाने स्थानिक नागरिकांची फसवणूक केली आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, रहिवाश्यांना वेठीस धरणाऱ्या विकासकांवर शासनाच्या वतीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे (१४-०२-२०२४) :** (१) व (२) भूकर पाहणी क्र. १८१ व १८६ परेल शिवडी विभाग, या भूखंडावर दोन "अ" वर्ग १९४० पुर्वीच्या उपकरप्राप्त इमारती होत्या. त्याचप्रमाणे सदर भूखंडावर काही बिगर उपकरप्राप्त इमारती आहेत. उपकरप्राप्त इमारतीमध्ये एकूण १३२ भाडेकरु / रहिवाश्यांपैकी ११२ भाडेकरु/रहिवाशी मंडळाच्या प्रतिक्षानगर सायन व स्वान मिल कंपाऊंड शिवडी या संक्रमण शिबीरात वास्तव्यास आहेत.
(३) पुनर्विकासास असहकार्य करणाऱ्या भाडेकरु/रहिवाशी, ना-हरकत प्रमाणपत्रधारक व भाडेकरु/रहिवाशी यांच्यातील न्यायालयीन प्रकरणे व वादामुळे पुनर्विकासाचे काम सुरु होऊ शकले नाही, ही वस्तुस्थिती आहे. मंडळाने प्रत्यक्ष जागेवर पाहणी करुन पुनर्विकासाचे काम त्वरीत सुरु करण्यास तसेच वेळोवेळी सुनावण्या घेऊन ना-हरकत प्रमाणपत्रधारक व भाडेकरु/रहिवाश्यांमधील प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला आहे.
(४) विकास नियंत्रण नियमावली ३३(७) अन्वये अर्धवट अवस्थेत सोडलेले पुनर्विकास प्रकल्प पूर्ण करणेबाबत शासनाने दि.०२.१२.२०२२ रोजी म्हाड अधिनियम १९७६ मध्ये सुधारणा करुन नविन कलम ९१(अ) अंतर्भूत केले आहे. ना-हरकत प्रमाणपत्रधारक/विकासकाने लवकरात लवकर पुनर्विकासाचे काम सुरु केले नाही तर उपरोक्त तरतुदीनुसार पुढील कार्यवाही करण्याचे मंडळाच्या स्तरावरुन प्रस्तावित आहे.

---

**मुंबई येथील हिरजी भोजराज चाळीचा पुर्नविकासाबाबत**

**(९) ४८००८ (२५-०९-२०२२). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई येथील इमारत क्र.३९-४३ हिरजी भोजराज चाळ, रामभाऊ भोगले मार्ग, मुंबई १० या इमारतीच्या पुनर्विकासासाठी दिनांक २१ जुलै, २०१४ मध्ये मंडळाने इमारतीस " ना-हरकत प्रमाणपत्र" दिले असून आठ वर्षाचा कालावधी उलटूनही विकासकाने इमारतीचे बांधकाम पुर्ण केले नाही व भाडे कराराप्रमाणे रहिवाश्यांना भाडे दिले नसल्याची बाब माहे जून, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत भाडेकरूनी कोर्टातून दिनांक २७ जुलै, २०२१ रोजी विकासकाविरूध्द सकारात्मक आदेश मिळवून विकासकाची मालमत्ता जप्तीचे आदेश करून भाडेकरूची देणी देण्यास सांगितले व प्रकल्प म्हाडाने ताब्यात घेऊन पुर्ण करण्याच्या सुचना दिल्या होत्या, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी कोर्टाचे आदेश असतानाही सदर आदेशाप्रमाणे कार्यवाही न करता कोर्टाच्या आदेशाचे उल्लघंन करून श्री. अरूण डोंगरे, मुख्य अधिकारी, इ.दु व पु.मंडळ यांनी भाडेकरूनांना देय रक्कम अदा न करता विकासकास ८० टक्के प्रोत्साहन एफएसआय सह रिवाईज " ना-हरकत प्रमाणपत्र " दिनांक २६ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यानुसार वा त्यादरम्यान वितरीत केले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार कोर्टाच्या आदेशाचे उल्लघंन करणाऱ्या श्री.अरूण डोंगरे, मुख्य अधिकारी, इ.दु व पु.मंडळ तसेच उक्त विकासक व इतर संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे, तसेच उक्त इमारतीतील रहिवाशांना त्यांची हक्काची घरे आणि प्रलंबित असलेल्या भाडे कराराची रक्कम त्वरीत उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (१४-०२-२०२४) :** (१) व (२) होय, अंशत: खरे आहे.
(३) मा. उच्च न्यायालयाने दि. २७.०७.२०२१ रोजी दिलेल्या आदेशानुसार मंडळाने ना-हरकत प्रमाणपत्रधारकांस दि.२९.०९.२०२१ रोजीच्या पत्रान्वये अनुपालन अहवाल सादर करण्यास कळविले होते. त्यानुसार ना-हरकत प्रमाणपत्रधारकांने भाडेकरू / रहिवाश्यांसोबत केलेल्या कायमस्वरुपी पर्यायी निवासाच्या कराराच्या प्रती तसेच ना-हरकत

प्रमाणपत्रधारकांच्या वकीलाने भाडेकरू / रहिवाशी यांचे वकील श्री. किरण जैन यांच्याशी केलेला पत्रव्यवहार व भाडेकरु / रहिवाश्यांना पर्यायी जागेसाठी देण्यात आलेले भाड्याचा तपशिल मंडळास सादर केला. ना-हरकत प्रमाणपत्रधारकाने सादर केलेल्या कागदपत्रांच्या अनुषंगाने मंडळाने सुधारित ना-हरकत प्रमाणपत्र दि. २६.११.२०२१ रोजीच्या पत्राव्दारे प्रदान करण्यात आले होते. परंतु भाडेकरू / रहिवाश्यांचे वकील श्री. किरण जैन यांनी मंडळाने जारी केलेल्या सुधारित ना-हरकत प्रमाणपत्रावर आक्षेप घेतला. सबब, ना-हरकत प्रमाणपत्रधारक आणि भाडेकरु/रहिवाशी यांच्यात अद्यापही थकीत भाडे भरण्याबाबत वाद सुरु असल्याचे निदर्शनास आल्याने, मंडळाने सदर सुधारित ना-हरकत प्रमाणपत्र दि.२५.०२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये रद्द केले आहे.

(४) मा. न्यायालयाने दि. १७.०२.२०२२ रोजी दिलेल्या आदेशानुसार मुख्य अधिकारी, दुवपु मंडळ व निवासी कार्यकारी अभियंता, दुवपु मंडळ यांनी सविस्तर वस्तुस्थिती दर्शक शपथपत्र मा. उच्च न्यायालयात माहे फेब्रुवारी २०२२ मध्ये सादर केले होते. मा. उच्च न्यायालयाने सदर शपथपत्राची दखल घेऊन मंडळाने सुधारित ना-हरकत प्रमाणपत्र दि.२५.०२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये रद्द केल्याबाबतची नोंद घेतली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील रे रोड विभागातील दारुखाना भागात महिलांचे अश्लील चित्रीकरण होत असल्याबाबत

**(१०) ५०७८५ (०१-०९-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील रे रोड विभागातील दारुखाना भागात महिलांचे अश्लील व्हिडीओ बनवून त्यांचे शोषण करण्यात येत असल्याचे माहे सप्टेंबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, या भागात राहणारी १५ ते २० मुले या प्रकरणात सामील असल्याचे समोर आले आहे, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, या भागातील झोपड्यात पेन कॅमेरा व इतर गोष्टींच्या सहाय्याने रात्रीचे वेळी शुटींग करुन त्या आधारे लैंगिक शोषण व ब्लॅकमेलींग करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय ,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०२-२०२४) :** (१) सदर घटना सन २०१९ ते २०२० लॉकडाऊन कालावधीत घडलेली आहे.

(२) व (३) सन २०१९ ते २०२० मध्ये बोट हार्ट रोड, साईबाबा मंदिराजवळ, दारुखाना, शिवडी, मुंबई या ठिकाणी यातील आरोपींनी आपआपसात संगनमत करुन फिर्यादी यांचे तसेच त्याच्या परिसरातील महिलांचे खाजगितील कृती करीत असताना त्यांच्या घरातील बंद दरवाजाची फट, उघडी खिडकी तसेच घराच्या उघड्या भागातून त्यांच्या उघड्या अवयवाकडे पाहून त्याच्याकडील मोबाईल किंवा अन्य तत्सम साधनांचा सहाय्याने लैगिंक समाधान मिळवण्याच्या उद्देशाने त्यांचे छायाचित्रण करुन ते हस्तगत केले आणि कब्जात बाळगले, तसेच अन्यत्र पाठवण्याची व्यवस्था करण्याकरिता ते मोबाईल मधून पेनड्राईव्ह मध्ये घेतले म्हणून शिवडी पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र.४६७/२०२२, कलम ३५४ (क), २९२, ३४ भा.द.वि.सह कलम ६६ (इ), ६७ (अ) माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० सह १२ पोक्सो ॲक्ट अन्वये ५ जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) सदर गुन्ह्यातील ५ आरोपींना अटक करण्यात आलेली असून न्यायालयीन कोठडीत आहेत. मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### चंद्रपूर जिल्ह्यातील ओबीसी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(११) ५२१०० (२३-०१-२०२३). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर (जि.चंद्रपूर) जिल्हापरिषद, समाज कल्याण अधिकारी कार्यालय यांच्यामार्फत इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत ओबीसी विदयार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याची घोषणा केली, परंतु मागील तीन वर्षांपासून सदर प्रस्तावावर शासनाने मंजूरी दिली नसल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ओबीसी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळत नसल्याने त्यांच्या पालकांना शिक्षण देताना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार ओबीसी विदयार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०९-०२-२०२४) :** (१) (२)व (३) इतर मागास प्रवर्गातील गरीब कुटुंबातील मुलांमध्ये शिक्षणाचा प्रसार होण्याच्या दृष्टीने राज्यात गळतीचे प्रमाण कमी व्हावे म्हणून भारत सरकार मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजना दिनांक २७.०५.२०१९ च्या शासन निर्णयान्वये राबविण्यात येत आहे. त्याचप्रमाणे इतर मागास वर्गातील ५ ते ७ वी च्या मुलींकरिता आणि ८ वी ते १० वी च्या मुलींकरिता सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना अशा २ योजना राबविल्या जातात.

सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात भारत सरकार मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजनेकरिता राज्य हिश्श्याचा रु.९६.८० लाख निधी संचालनालयामार्फत चंद्रपूर जिल्हयास वितरीत करण्यात आला आहे. सन २०२२-२३ पासून केंद्र सरकारने सुधारित मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्यामुळे सदर मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी राज्यात करण्याच्या अनुषंगाने मंत्रीमंडळ प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. मा.मंत्रीमंडळाच्या मान्यतेनंतर या योजनेकरिता निधी वितरणाची कार्यवाही करता येईल.

इतर मागास वर्गातील ५ ते ७ वी च्या मुलींकरिता सावित्रीबाई फुले योजनेअंतर्गत सन २०२१-२२ मध्ये रु.२.५० लाख, सन २०२२-२३ मध्ये रु.३९.६८ लाख आणि सन २०२३-२४ मध्ये आतापर्यंत रु.४.८४ लाख इतका निधी संचालनालयामार्फत चंद्रपूर जिल्हयास वितरीत करण्यात आला असून ८ वी ते १० वी च्या मुलींकरिता सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत सन २०२१-२२ मध्ये रु.१९.९८ लाख, सन २०२२-२३ मध्ये रु.७७.०० लाख आणि सन २०२३-२४ मध्ये आतापर्यंत रु.१.७२ लाख इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### हिंगणा (जि.वर्धा ) तालुक्यातील पठार भागात असणाऱ्या गावांना २७ वर्षांपूर्वी मंजूर झालेल्या धरण प्रकल्पाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(१२) ५८५९६ (०२-०५-२०२३). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगणा तालुक्यातील (जि.वर्धा) लगत असलेल्या पठार भागात असणाऱ्या गावांना शेतीसाठी पाणी मिळावे, यासाठी पेंढरी गावाजवळ २७ वर्षापूर्वी तत्कालीन कृषी मंत्री यांनी धरण प्रकल्प मंजूर करुन त्या धरणाचे काम देखील सुरु करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्या धरण प्रकल्पाअंतर्गत १५ टक्के वनजमीन असल्याने हा प्रकल्प प्रलंबित असल्याने शासनाने या प्रकल्पाला एकतर नव्याने मंजुरी देऊन पूर्ण करावा अन्यथा अधिग्रहीत केलेल्या जमिनी संबधितांना परत कराव्या अशी

मागणी पेंढरी परिसरातील शेतकऱ्यांनी केली असल्याचे दि. २९ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने कोणत्याही प्रकल्पासाठी शेतकऱ्यांची जमीन भूसंपादित केल्यानंतर, १५ वर्षे जर त्या जमिनीवर प्रकल्प तयार होत नसेल तर त्या जमिनी शेतकऱ्यांना परत देण्यात याव्यात, सदर आदेशाच्या आधारे हा प्रकल्प शासनाने तातडीने मंजूर करुन पूर्ण करावा अथवा सदर शेतजमिनी परत कराव्यात अशी मागणी त्या परिसरातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार प्रकल्पाचे काम सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (०१-०२-२०२४) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) होय, वनजमीनीचा प्रस्ताव केद्र शासनाकडून दि. ०४.०३.१९९६ अन्वये रद्द करण्यात आला आहे.
(४) केंद्र शासनाकडून वन जमिनीचा प्रस्ताव रद्द करण्यात आल्याने काम सुरु करण्याबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### माथाडी संघटनेच्या नावाखाली खंडणी मागण्याच्या प्रकार वाढ होत असल्याबाबत

**(१३) ६०५१० (३०-०४-२०२३). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विमान नगर (पुणे)भागातील एका मॉल मधील साहित्य उचलण्याचे काम माथाडी संघटनेकडून करून द्यावे म्हणून खंडणी मागण्याची घटना माहे जानेवारी २०२३, मध्ये वा त्यादरम्यन निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर खंडणीखोरावर पोलिसांनी गुन्हे दाखल केले, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, खंडणीच्या घटना वारंवार घडत असल्याने पोलीस आयुक्तांनी उद्योग आयटी कंपन्या व्यापारी संघटना यांच्या प्रतिनिधी समवेत बैठक आयोजित केली होती हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त बैठक झाल्यानंतर सुद्धा वारजे भागातील एका हॉटेल व्यावसायीकाकडे माथाडी संघटनेच्या नावावर खंडणी मागणाऱ्या दोघांवर कारवाई केली, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन खंडणी मागण्याच्या टोळी ला आळा घालण्याच्यादृष्टिने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-११-२०२३) :** (१), (२) व (३) होय.
(४) नाही.
(५) पोलीस आयुक्त, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली दि. २४/०१/२०२३ रोजी पुणे आयुक्तालय हददीतील औदयोगिक कंपन्या, आय.टी. कंपन्या, व्यावसायिक व्यापारी संघटना, चेंबर्स - ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज यांची बैठक घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये गुन्हेगारी टोळयांमार्फत खंडणी वसूली, कथित माथाडी संघटना यांचेपासून होणारा त्रास या समस्या जाणून घेवून भयमुक्त वातावरण तयार करुन अशा गुन्हेगारी लोकांवर कठोर कारवाईचे आश्वासन देण्यात आले आहे.
औदयोगिक कंपन्या, व्यापारी आय.टी. कंपनी यांच्या तक्रारींची तात्काळ दखल घेण्याकरीता परिमंडळ पोलीस उप आयुक्त यांची नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. तसेच पोलीस उप आयुक्त गुन्हे शाखा यांच्या अधिपत्याखाली खंडणी विरोधी पथक - १ व २ यांचे प्रभारी यांची विशेष पथक म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.
व्यावसायिकांच्या समस्या जाणून घेऊन सोडवणूक करण्यासाठी ठोस उपाययोजना करण्यात आल्या आहेत.
यासोबतच सर्व पोलीस स्टेशन प्रभारी यांना आय.टी. कंपनी यांच्या तक्रारींची तात्काळ दखल घेवून कारवाई करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

---

**राज्यात बालगुन्हेगारी वाढत असल्याबाबत**

**(१४) ६४५९२ (२९-०८-२०२३). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बालगुन्हेगारीत महाराष्ट्र राज्य दुसऱ्या स्थानावर असल्याची चिंताजनक बाब दिनांक २७ मे २०१९ रोजी वा त्या सुमारस उघडकीस आली हे खरे काय,

(२) असल्यास, माहे जानेवारी २०२२ ते माहे एप्रिल २०२३ या कालावधीत नागपूर शहरात ४१३ विविध गुन्ह्यात ४६७ बालगुन्हेगारावर गुन्हे दाखल झाले असून त्यात खून,दरोडा , घरफोडी खुणाचा प्रयत्न , चोरी, दुखापत करणे अशा गुन्ह्यांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर हे राज्याचे उपराजधानीचे ठिकाण असून काही वर्षांपासून नागपूर शहराची क्राईम सिटी अशी ओळख निर्माण झालेली असताना सर्वाधिक बाल गुन्हेगार सुद्धा नागपूर शहरात आढळून आल्याची माहिती उघडकीस आली आहे. हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बालगुन्हेगारीस प्रतिबंध करण्यासाठी काय उपाययोजनात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०१-२०२४) :** (१) क्राईम ईन इंडिया-२०२१ च्या प्रकाशित अहवालानुसार बालगुन्हेगारीत चे (भा.द.वि.+विशेष स्थानिक गुन्हे) महाराष्ट्र राज्यात ४५५४ गुन्हे दाखल झाले आहेत. देशात महाराष्ट्र राज्याचा दुसरा क्रमांक लागतो.

(२) व (३) नागपूर शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत माहे जानेवारी, २०२२ ते माहे एप्रिल, २०२३ या कालवधीत बालगुन्हेगारांवर दाखल गुन्ह्याची माहिती खलीलप्रमाणे आहे.

| शिर्षक | विधी संघर्षग्रस्त बालकांचा सहभाग असलेले (दाखल गुन्हे) | त्या मधील विधी संघर्षग्रस्त बालकांची संख्या |
|---|---|---|
| खून | ०९ | १४ |
| दरोडा | ०६ | १० |
| घरफोडी | ६५ | ७१ |
| खुनाचा प्रयत्न | १८ | २१ |
| चोरी | १२१ | १३२ |
| दुखापत | ९४ | १२८ |
| विधी संघर्षग्रस्त बालकांचा सहभाग असलेले इतर गुन्हे | १४२ | १७७ |
| एकूण | ४५५ | ५५३ |

(३) बालगुन्हेगारीस प्रतिबंध करण्यासाठी वाईट संगतीमुळे जी मुले प्रवाहाविरुध्द वागायला लागतात व त्यांना लागलेले व्यसन भागविण्यासाठी गुन्हेगारी वृत्तीकडे वळून गुन्हे करतात अश्या वृत्तीच्या बालकांचे मत वळवून त्यांना गुन्हेगारी वातावरणापासून परावृत्त करण्यासाठी व गुन्हेगारीला आळा घालता यावा यासाठी मोहे ऑगस्ट,२०१८ साली नागपूर शहर पोलीस आयुक्तालयात Counselling And Reformative Education Centre (CARE) असे विशेष बालपोलीस पथक स्थापन करण्यात आले आहे. पोलीस घटकात पोलीस ठाणे स्तरावर नागपूर शहर आयुक्तालय अंतर्गत प्रत्येक पोलीस ठाणे येथे बाल पोलीस अधिकारी व पोलीस दीदी यांची नेमणूक करण्यात आली आहे. या पथकामार्फत

समुपदेशन कार्यक्रम, प्रबोधनात्मक मार्गदर्शन कार्यक्रम, प्रबोधात्मक चित्रपट दाखविणे, मोटिवेशनल व्याख्याने आयोजित करणे असे कार्यक्रम घेवून विधीसंघर्षग्रस्त बालकांना मुख्य प्रवाहात आण्याण्याचे प्रयत्न करणे सुरु आहे. "केअर" या उपक्रामाअंतर्गत विधीसंघर्षग्रस्त बालकांकरीता क्रिकेट सामने, समुपदेशन कार्यक्रम, व्यसनमुक्ती समुपदेशन कार्यक्रम, फुटबॉल सामना, विविध खेळाचे आयोजन व मनोरंजन कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशिम (जि.हिगोंली) येथील छत्रपती शिवाजी माध्यमिक विद्यालय या शाळेतील मुख्याध्यापकाने लाच घेतल्याबाबत**

**(१५) ६४८२४ (२७-०९-२०२३).श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) वाशिम (जि. हिंगोली) येथील पुर्णा सहकारी साखर कारखाना परिसरातील छत्रपती शिवाजी माध्यमिक विद्यालय या शाळेतील मुख्याध्यापकाने शाळेतील शिपायाला शाळेच्या प्रणालीमध्ये नाव समाविष्ट करण्याचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयात पाठविण्यासाठी तब्बल ४० हजाराची लाच घेताना त्यांना लाचलुचपत प्रतिबंधक पथकाने अटक केली असल्याचे माहे मे २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या घटना शिक्षण क्षेत्राची बदनामी करण्यारे असल्याने उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर मुख्याध्यापकावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०१-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२)

I. सदर प्रकरणी, तक्रारदार यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने, तक्रारदार यांचे शिपाई पदाचे मानधन मिळण्यासाठी व त्यांचे नाव शालेय प्रणालीमध्ये समाविष्ट करण्यासाठीचा प्रस्ताव जिल्हा परिषद, हिंगोली येथे सादर करण्यासाठी आलोसे मुख्याध्यापक श्री. शिवाजी माध्यमिक विद्यालय पुर्णा सहकारी साखर कारखाना, वसमत, हिंगोली यांनी तक्रारदार यांच्याकडून रुपये ६०,०००/- इतक्या रकमेच्या लाचेची मागणी केल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पडताळणीअंती निष्पन्न झाले. लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान आलोसे यांना मागणी केलेल्या रकमेपैकी पहिला हफ्ता ४०,०००/- इतक्या रुपयांची लाच पंचासमक्ष स्वतः स्विकारतांना रंगेहाथ पकडण्यात आल्याने त्यांच्याविरुध्द दिनांक ११.०५.२०२३ रोजी वसमत (ग्रामीण) पोलीस ठाणे, हिंगोली येथे गु.र.नं.१०३/२०२३ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ (सुधारणा २०१८) च्या कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करुन दिनांक ११.०५.२०२३ रोजी अटक करण्यात आली आहे. तसेच सदर गुन्ह्याच्या तपासात सहशिक्षक आलोसे सुनिल श्रंगारे यांनी लाचेची रक्कम देण्यासाठी तक्रारदार यांना प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांच्याविरुद्ध कलम १२, भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ (सुधारणा २०१८) अन्वये कलम वाढ करुन सदर गुन्ह्यामध्ये
त्यांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याचा तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड यांच्यामार्फत सुरु आहे.
II. सदर प्रकरणी श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, पुर्णा, परभणी, या संस्थेने आरोपी लोकसेवक मुख्याध्यापक व सह आरोपी लोकसेवक सह शिक्षक यांना दिनांक २५.०५.२०२३ रोजीच्या आदेशान्वये निलंबित करण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रत्नागिरी जिल्हयातून जप्त करण्यात आलेले अंमली पदार्थ

**(१६) ६४९७६ (२७-०९-२०२३). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयात विविध ठिकाणी पोलिसांनी अंमली पदार्थविरोधी मोहिम राबवून अंमली पदार्थांची विक्री व सेवन करणाऱ्यांना अटक करुन मोठया प्रमाणात वेगवेगळया प्रकारचे अंमली पदार्थ जप्त केले असल्याचे दि. ९ मे ते १४ मे, २०२३ यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मोहिमेत किती जणांवर कारवाई करण्यात आली आणि त्यांच्याकडे कोणकोणत्या प्रकारचे अंमली पदार्थ आढळून तसेच चिपळूण जिल्ह्यात हे अंमली पदार्थ खरेदी-विक्रीचे केंद्र असल्याचे निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, केटामाईन २ कोटी ८८ लाख रूपयांचे नामक अंमली पदार्थांची विक्री करताना माहे मे २०१४ मध्ये चिपळूण येथे ५ जणांना पोलिसांनी अटक केले असून सदर अंमली पदार्थ लोटे (ता. खेड) औदयोगिक वसाहतीतील सुप्रिया लाईफसायन्स लि. या कंपनीमध्ये तयार करण्यात आल्याचे आणि पकडण्यात आलेल्यांपैकी काहीजण या कंपनीचे कर्मचारीच असल्याचे तपासात निष्पन्न झाले होते, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कारखान्यातून पुन्हा अंमली पदार्थांची निर्मिती केली जात असून माहे मे , २०२३ मध्ये करण्यात आलेल्या कारवाईमध्ये या कंपनीचा संबंध आहे काय याबाबतचा तपास करण्यात आला आहे काय त्यात काय निष्पन्न झाले,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२४) :** (१) होय,

(२) दि.०९ मे, २०२३ ते दि.१४ मे, २०२३ या कालावधीत अंमली पदार्थ विरोधी कायद्याखाली रत्नागिरी शहर पोलीस ठाणे, लांजा पोलीस ठाणे व रत्नागिरी ग्रामीण पोलीस ठाणे येथे एकूण ५ गुन्हे दाखल करण्यात आले असुन एकूण १५ आरोपींवर कारवाई करण्यात येवुन त्यांचेकडून ब्राऊन हॅरॉईन ३४.९३ ग्रॅम, गांजा ५८.३९ ग्रॅम असे अंमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत.

चिपळूण हे अंमली पदार्थ खरेदी विक्रीचे केंद्र असल्याचे निदर्शनास आलेले नाही. नमुद कालावधीत चिपळूण पोलीस ठाण्याचे हद्दीत अंमली पदार्थ विरोधी कायद्याखाली गुन्हे दाखल नाहीत.

(३) व (४)

सन २०१४ साली चिपळूण पोलीस ठाणे यांनी ५ आरोपींना केटामाईन नामक अंमली पदार्थांची अनधिकृतपणे विक्री करणेच्या उद्देशाने जवळ बाळगले स्थितीत मिळून आल्याने अटक करण्यात आले होते. सदर गुन्ह्यात रू.२,७८,६०,०००/- किंमतीचा केटामाईन हा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील १ आरोपी हा सुप्रिया लाईफ सायन्स लिमीटेड कंपनी मध्ये हेल्पर म्हणुन कामाला असताना त्याने कंपनीत उत्पादित होणारी केटामाईनची पावडर ही थोडी थोडी चोरुन कंपनीतून बाहेर आणुन ती दुस-या आरोपीकडे आणुन देत असे.

माहे मे, २०२३ महिन्यात लोटे (ता खेड) औद्योगिक वसाहतीतील सुप्रिया लाईफसायन्स लि. या कंपनी बाबत अंमली पदार्थ विरोधी कायद्याखाली गुन्हे दाखल नाहीत. तसेच माहे मे, २०२३ मध्ये करण्यात आलेल्या कारवाईमध्ये सुप्रिया लाईफसायन्स लि. या कंपनीचा संबंध असल्याबाबतचा कोणताही पुरावा तपासामध्ये निष्पन्न झालेला नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्या. येवला शहर या उपविभागातील ग्रामीण भागाचे विभाजन करून एक नवीन उपविभाग निर्माण करण्याबाबत

**(१७) ६५०४४ (२९-०८-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्या. येवला शहर या उपविभागातील ग्रामीण भागाचे विभाजन करून एक नवीन उपविभाग निर्माण करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि. १६ डिसेंबर २०२२ रोजी वा त्या सुमारास मुख्य अभियंता नाशिक व मा.उपमुख्यमंत्री यांचेकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,येवला शहर कक्षात सद्यस्थितीत १६ हजार ग्राहक असल्यामुळे ग्राहक सेवा, वीज वितरण आणि थकबाकी वसुली या कामावर प्रचंड ताण येत असल्यामुळे येवला शहर कक्ष कार्यालयाचे विभाजन करून एक नवीन उपविभाग निर्माण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०१-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) सद्यस्थितीत येवला शहर कक्ष कार्यालयातील वीज ग्राहकांची संख्या १५,१३३ इतकी असून महावितरण कंपनीच्या निश्चित ग्राहक मानंकानुसार येवला शहर कक्ष सद्यस्थितीत विभाजनक्षम नाही.

भविष्यात ग्राहक मानंकाचे निकष पूर्ण झाल्यास कंपनीची ग्राहक मानंके व आर्थिक दायित्वाचा विचार करुन याबाबत योग्य कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील विले पार्ले पश्चिम येथे मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थ्यांची विक्री होत असल्याबाबत

**(१८) ६५०५३ (२७-०९-२०२३). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील विले पार्ले पश्चिमेकडील कृपा नगर, दादाभाई क्रॉस रोड क्र.३, वल्लभभाई पटेल रोड व पौंड गावठाण येथील टेक्निकल स्कूल परिसरात सार्वजनिक ठिकाणी मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थ विक्री व सेवन होत असल्याचे माहे मे २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे रात्रीच्या वेळेस आजूबाजूच्या परिसरातील महिलांना ये जा करणे कठीण झाले असल्याने याबाबत लोकप्रतिनिधी तसेच स्थानिक नागरिकांनी तक्रारी केल्यानंतरही कठोर प्रतिबंधात्मक कारवाई होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या परिसरात समाजविघातक घटना वाढत असल्याने शासनाने चौकशी करुन अंमली पदार्थ विक्री तसेच सेवन करणाऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाई करून अशा प्रकारांना आळा घालण्याकरिता शासन काही ठोस उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२४) :** (१) व (२)नाही, हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भुसावळ तालुक्यातील कुर्हे पानाचे येथील शेतकऱ्याची सातबारा उताऱ्यावर शेतीची नोंद लावण्यासाठी मंडळअधिकाऱ्याच्या नावाने लाच मागितली असल्याबाबत**

**(१९) ६५१३४ (२७-०९-२०२३). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)भुसावळ (जि.जळगांव) तालुक्यातील कुर्हे पानाचे येथील शेतकऱ्याची सातबारा उताऱ्यावर शेतीची नोंद लावण्यासाठी मंडळअधिकाऱ्यांच्या नावाने १२हजार लाच मागून ती स्वीकारणाऱ्या खाजगी व्यक्तिसह कोतवालला जळगाव लाच लुचपत विभागाच्या पथकाने दिनांक २० एप्रिल २०२३ रोजी वा त्यासुमारास अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२)असल्यास , उक्त घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३)असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत त्या अनुषंगाने दोषी व्यक्तीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०१-२०२४) :** (१), (२) व (३)

I. सदर प्रकरणी तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने, लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार यांनी खरेदी केलेल्या शेत जमिनीच्या सातबारा उता-यावर त्यांच्या नावाची नोंद करण्याचे काम मंडळ अधिकारी यांच्याकडून करुन देण्याच्या मोबदल्यात आलोसे, कोतवाल, (वर्ग-४) नेमणुक-तहसिल कार्यालय, भुसावळ, जळगांव यांनी तक्रारदार यांच्याकडे १५०००/- रुपये इतक्या रकमेच्या लाचेची मागणी व तडजोडीअंती रु.१२,०००/- रुपये इतक्या रकमेच्या लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम खाजगी इसम यांनी आलोसे, कोतवाल यांचेकरिता त्यांच्या उपस्थितीत स्विकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आल्याने त्यांच्या विरुद्ध भुसावळ शहर पोलीस ठाणे गु.र.क्र ४९/२०२३ भ्र.प्र.अधि. सन १९८८ चे कलम ७, ७ (अ) प्रमाणे दिनांक १८.०४.२०२३ रोजी गुन्हा दाखल करुन त्यांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याचा तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जळगाव यांच्यामार्फत सुरु आहे.

II. तसेच या प्रकरणी, तहसिलदार, भुसावळ यांनी दिनांक ३१.०५.२०२३ रोजीच्या आदेशान्वये संबंधित आलोसे कोतवाल यांना अटक केल्याच्या दिनांकापासून म्हणजेच दिनांक १८.०४.२०२३ रोजीपासून सेवेतून निलंबित करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्थेतील श्री सतीश भाऊराव खरे यांना लाच घेताना अटक करण्यात आल्याबाबत**

**(२०) ६५१५३ (२७-०९-२०२३). श्री.निलेश लंके (पारनेर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्थेतील श्री. सतीश भाऊराव खरे व शैलेश सुमातीलाल सभद्रा यांना ३० लाख रुपयांची लाच घेताना दिनांक १५ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने रंगेहात अटक केल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री. सतीश भाऊराव खरे व शैलेश सुमातीलाल सभद्रा या दोघांची घरे, ऑफिस, बँक लॉकर्स ई. झडती घेण्यात आली असून झडती मध्ये अन्य कोणती व किती संपत्ती बेहिशोबी आढळून आली,

(३) असल्यास, उक्त तपास पोलीस अधीक्षक श्रीमती शर्मिला वालावलकर यांच्या मार्गदर्शनाखाली सदरहु तपास करण्यात आला आहे, त्या तपासाचे निष्कर्ष काय आहेत, त्याअनुषंगाने संबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०१-२०२४) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
सदर प्रकरणी, तक्रारदार हे नाशिक जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीमध्ये संचालकपदी निवडून आल्यानंतर त्यांच्या निवडीविरुध्द विरोधी गटाने जिल्हा निवडणूक अधिकारी, कृषी उत्पन्न बाजार समिती तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नाशिक यांच्या कार्यालयात सदर निवड रद्द होण्यासाठी अपील दाखल केले होते. या अपील प्रकरणात सुनावणी घेऊन तक्रारदार यांच्या बाजूने निर्णय देण्यासाठी आरोपी लोकसेवक, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांनी स्वतःकरिता रुपये ३० लक्ष इतक्या रकमेच्या लाचेची मागणी केल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पडताळणीअंती निष्पन्न झाले. लाचपुचपत प्रतिबंधक विभागामार्फत करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान आलोसे यांना त्यांच्या राहत्या निवासस्थानी ३० लक्ष रुपयांची लाच स्विकारतांना रंगेहाथ पकडण्यात आल्याने त्यांच्याविरुध्द दिनांक १६.०५.२०२३ रोजी गंगापूर पोलीस ठाणे, नाशिक शहर येथे गु.र.नं.१२३/२०२३ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ (सुधारणा २०१८) च्या कलम ७, ७अ, प्रमाणे गुन्हा दाखल करुन दिनांक १६.०५.२०२३ रोजी अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याचा तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक यांच्यामार्फत सुरु आहे.
(२) सदर प्रकरणी, आलोसे क्र.१, जिल्हा उपनिबंधक, वर्ग १ सहकारी संस्था, नाशिक यांच्या घराच्या घरझडतीमध्ये रु.३९,२९,३४९/- किंमतीचे सोन्याचे दागिने व चांदीची भांडी, रोख रक्कम रुपये १५,८६,४००/- व घरातील साहित्यासह मालमत्ता अशी एकूण ६१,४३,६००/- एवढी मालमत्ता मिळुन आलेली आहे. तसेच आलोसे व त्यांच्या कुटुंबियांच्या विविध बँक खात्यांमध्ये एकुण रु. ४४,२६,७६४/- इतकी रक्कम असल्याची माहिती प्राप्त झालेली आहे. तसेच आलोसे क्र.२ श्री. शैलेश सुमतीलाल साबद्रा हे खाजगी इसम असून त्यांची घराची, ऑफिस, बॅक लॉकर्स इत्यादीची झडती घेण्यात आलेली नाही.
(३)
I. सदर प्रकरणी संबंधित आरोपी लोकसेवक, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांना सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या दिनांक १७.०५.२०२३ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे.
II. आरोपी लोकसेवक यांची महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ अंतर्गत शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित आहे.
III. सदर प्रकरणी चल/अचल मालमत्तेच्या अनुषंगाने अपसंपदा निष्पन्न होण्याची दाट शक्यता असल्याने आरोपी लोकसेवक यांच्याविरुद्ध उघड चौकशी प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंधुदुर्ग जिल्ह्यात सायबर क्राईम पासून होणा-या ऑनलाईन फसवणुकीच्या प्रकारांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असल्याबाबत**

**(२१) ६५१८९ (२७-०९-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ऑनलाईन फसवणुकीच्या प्रकारांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असल्यामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यात अशा सायबर क्राईम पासून होणा-या अन्यायाविरुध्द सहजपणे तक्रार नोंदवा असे आवाहन पोलीस प्रशासनाच्यावतीने करण्यात आले असून त्यासाठी ''टोल फ्री क्रमांक'' (१९३०) जाहीर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पोलीस प्रशासनाने जाहीर केलेल्या ''टोल फ्री क्रमांक वर संपर्क केला असता गोवा राज्याच्या कंट्रोल रुमशी संपर्क होत असून त्याठिकाणी तक्रार नोंदवून घेतली जात नाही, तर तुन्ही तुमच्या राज्याच्या सायबर विभागाशी संपर्क साधावा असे सांगण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सायबर गुन्ह्याची तक्रार करण्यासाठी संबंधित पोलीस ठाण्याशी संपर्क केल्यात त्यांच्याकडूनही तक्रारीची दखल न घेता सायबर गुन्ह्याची तक्रार असल्यास ऑनलाईन कार्यपध्दती कार्यान्वित आहे तेथे तक्रार करा असे सांगण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने यासर्व प्रकरणी चौकशी करुन सायबर गुन्ह्यात फसवणूक झालेल्या नागरीकांची गैरसोय होऊ नये याकरीता कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२४) :** (१) होय,
(२) होय,
सिंधुदुर्ग व गोवा या राज्यांच्या सीमा जवळ असल्याने झालेला तांत्रिक बिघाड दिनांक १८/०४/२०२३ रोजी दुरुस्त करुन १९३० हेल्पलाईनची सेवा सुरळीतपणे कार्यान्वित करण्यात आली आहे.
(३) नाही,
ऑनलाईन फसवणूक झाल्यासंबंधी तक्रारदार पोलीस ठाण्यात गेल्यावर तात्काळ तक्रार दाखल करुन घेण्यात येते.
(४) राज्यात सायबर गुन्ह्यांच्या तपासाकरीता एकुण ४८ सायबर पोलीस ठाणी कार्यान्वित झाली आहेत. सर्व सायबर पोलीस ठाण्यांना गुन्ह्याच्या तपासाकरीता अत्याधुनिक यंत्रसामग्री, विविध प्रकारचे १६ टूल्स उपलब्ध करून देण्यात आले आहेत.त्याचे पोलीसांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. सायबर गुन्हे संदर्भातील सर्व प्रकारच्या तक्रारी हाताळण्यासाठी National Cyber Crime Reporting Portal सुरू करण्यात आले आहे व नागरिकांना येणा-या शंकाचे समाधान करण्यासाठी टोल फ्रि हेल्प लाईन क्र.१९३० सुरु करण्यात आला आहे. संभाव्य सायबर गुन्हे टाळण्यासाठी जन जागरुकता शिबिराद्वारे, सोशल मिडियाद्वारे, इंटरनेट माध्यमांद्वारे तसेच मार्गदर्शिका (अॅडवायझरी) प्रसारित करून सर्व सामान्य नागरिकांना सायबर गुन्ह्याच्या अनुषंगाने सावध राहण्याचे आवाहन केले जाते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) परिसरात सुरू असलेला वेश्या व्यवसाय

**(२२) ६५२५१ (२७-०९-२०२३). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) परिसरात मोठया प्रमाणातसुरू असलेल्या वेश्या व्यवसायामुळे सर्वसामान्य नागरिक विशेषत: महिला वर्गात चिंतेचे वातावरण निर्माण झाले असल्याचे माहे मे २०२३ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वेश्या व्यवसाय करणा-या महिलांकडून होणारे अश्लिल वर्तन व सर्वसामान्यांची होणारी लुट यामुळे नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले असून येणा-या जाणा-या महिलांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित विभागाच्या अधिका-यांच्या दुर्लक्षामुळे पनवेल परिसरातील बस डेपो ते आंबेडकर रोड तसेच कळंबोली सर्कल येथे महामार्गाजवळ मोठया प्रमाणात वेश्या व्यवसाय सुरू आहे,हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून उक्त विभागात वैश्या व्यवसाय करणा-या महिलांवर तसेच सदर गंभीर बाबींकडे दुर्लक्ष करणा-या संबंधित विभागाच्या अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०१-२०२४) :** (१) अशा घटनांबाबत नागरिकांकडून तक्रारी प्राप्त नाहीत परंतु पनवेल परिसरात भादवि ३७० व अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा कलम ३, ४, ५ अन्वये सन २०२२ मध्ये ११ व सन २०२३ मध्ये १२ गुन्हे दाखल आहेत.
(२) सदरबाबत नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील ता. पनवेल, जि. रायगड परिसरातील पोलीस ठाणे येथे तक्रारी प्राप्त नाहीत.

(३) व ४)) पनवेल परिसरातील बस डेपो ते आंबेडकर रोड तसेच कळंबोली सर्कल येथे हायवेलगत वेश्याव्यवसाय सुरू आहे, हे खरे नाही.

सदर परिसरात दररोज महिला व पुरूष पोलीस अंमलदारांची फिक्स पॉईंट कर्तव्य नेमण्यात येत असून निर्भया पथकाद्वारे सतत गस्त घालण्यात येते. बिट अधिकारी,गुन्हे प्रकटीकरण पथक साध्या वेशात व गणवेशात दिवसा व रात्री गस्त करीत असतात. तसेच छुप्या पद्धतीने कोणी वावरताना निदर्शनास आल्यास त्यांचेवर त्वरीत उचित कारवाई करण्यात येते. महिला व नागरिक यांच्यात कोणतीही असुरक्षिततेची भावना नसावी, त्यांची लूट होऊ नये याबाबत खबरदारी घेण्याबाबत पोलीस आयुक्तांद्वारे पोलीस अधिकारी व अंमलदार यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवीन पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) सेक्टर ४, ८, ९, १० विभागात वारंवार वीज पुरवठा खंडित होत असल्याबाबत

**(२३) ६५२६९ (२७-०९-२०२३). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवीन पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) सेक्टर ४, ८, ९, १० या विभागात वारंवार वीज पुरवठा खंडित होत असल्यामुळे नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे जून २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण महामंडळाच्या नियोजन शुन्य कारभारामुळे नागरिकांना लोड शेडींगचा त्रास सहन करत लागत असून उन्हाळयामध्ये शालेय परिक्षांच्या काळात वारंवार विज पुरवठा खंडीत होत असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून नागरिकांना शारिरिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधीत विभागतील अधिका-यांना उक्त विभागातील वस्तुस्थिती निदर्शनास आणूनसुद्धा कायमस्वरूपी उपाययोजना होत नसल्यामुळे वीज खंडीत होण्याचे प्रकार वाढत आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून नवीन पनवेल सेक्टर ४, ८, ९, १० विभागातील विज पुरवठा अखंडीत सुरु ठेवण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०१-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.

पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) सेक्टर ४, ८, ९, १० या विभागामध्ये ३३/११ के. व्ही. सेक्टर ७ उपकेंद्रातून निघणाऱ्या ११ के.व्ही. सेक्टर ८ वाहिनी वरुन विद्युत पुरवठा केला जातो. माहे एप्रिल ते जून २०२३ या ३ महिन्याच्या कालावधीत सदर वाहिनीवर ९ वेळा (सर्व मिळून एकूण २३ तास) कालावधीसाठी वीज पुरवठा खंडीत झाला होता.

(२) व (३) बाबत,

महावितरणकडून सद्यस्थितीत लोड शेडिंग केली जात नाही. तथापि, ३३ के.व्ही. नवीन पनवेल वाहिनीच्या जुन्या व अनेक जोड (जीर्ण) असलेल्या ३३ के.व्ही. भूमिगत केबल वाहिनीवरील तांत्रिक बिघाडामुळे तसेच पनवेल महानगरपालिकेच्या रस्ता दुरुस्ती खोदकामामुळे विद्युत पुरवठा काही वेळा खंडित झाला होता. तथापि, महावितरणचे कर्मचारी व सूचिबध्द कंत्राटदारामार्फत कमीत कमी वेळेत वीज पुरवठा पुर्ववत करण्यात आला आहे.

तसेच, ३३ के. व्ही. पनवेल (पू) वाहिनीच्या जुन्या जीर्ण व अनेक जोडणी असलेल्या ३३ के. व्ही. भूमिगत वाहिनीच्या बिघाडामुळे वीज पुरवठा खंडीत झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(४) विद्युत पुरवठा खंडित झालेल्या घटना प्रामुख्याने सेक्टर ७ येथे ३३ के.व्ही. पनवेल (पू) वाहिनीच्या जुन्या जीर्ण व अनेक जोडणी असलेल्या ३३ के.व्ही. भूमिगत वाहिनीच्या बिघाडामुळे झाल्याचे निदर्शनास आले. त्याअनुषंगाने (i) सदर ठिकाणची जीर्ण व जुनी ५०० मीटर अंतराची ३३ केव्ही. केबल माहे मे, २०२३ रोजी बदलून कार्यान्वित करण्यात आली आहे. तसेच,(ii) पर्यायी व्यवस्थेसाठी ३३/११ के.व्ही. सेक्टर १५ नवीन पनवेल उपकेंद्रातून ३३/११ के.व्ही. सेक्टर ७ उपकेद्रासाठी ३३ के.व्ही. ची अतिरिक्त इनकमर वाहिनी कार्यान्वित करण्यात आली आहे.

यात्व्यतिरिक्त,(iii) पनवेल टिंबर मार्ट येथे २२०/३३ के.व्ही. टिंबर मार्ट अतिउच्च दाब उपकेंद्राचे काम प्रगतीपथावर असून सदर अतिउच्चदाब उपकेंद्रावरून एक नवीन अतिरिक्त ३३ के.व्ही. भूमिगत वाहिनी सेक्टर ७ पनवेल व खांदा कॉलनी या उपकेंद्रासाठी Power Evacuation योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड सिडको येथील महावितरण मधील सहाय्यक अभियंत्याच्या बेकायदेशीर निलंबनाबाबत**

**(२४) ६५५४९ (०३-०९-२०२३). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) नांदेड सिडको येथील महवितरणच्या सहाय्यक अभियंत्याचे संगणकीय आयडी वापरुन कार्यालय सहाय्यक तथा ऑपरेटर यांनी परस्पर अवैध वीज कनेक्शन दिले असल्याचे माहे मे २०२३ च्या दुसऱ्या आठवडयात निदर्शनास आले आहे हे खरे आहे, काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणात सिडको येथील सहाय्यक अभियंता यांना निलंबीत करण्यात आले असून हे निलंबन बेकायदेशीर आहे हे ही खरे आहे, काय,

(३) असल्यास, त्यामुळे येथील वीज अभियत्यांनी अधिक्षक अभित्यांच्या कक्षात ठिय्या आंदोलन केले असून सदरील निलंबन मागे घ्यावे अशी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्याअनुषंगाने सदर मागणीवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०१-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

तथापि, सहाय्यक अभियंता, सिडको यांनी त्यांच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेले कनिष्ठ कार्यालयीन सहाय्यक यांना भ्रमणध्वनीव्दारे असंवैधानिक संवाद केलेल्या संभाषणाची ध्वनीफीत समाज माध्यमावर प्रसारित झाली. सदर ध्वनीफीत नांदेड मंडळ कार्यालयास प्राप्त झाली. सहाय्यक अभियंता यांच्याकडून सदर कनिष्ठ कार्यालयीन सहाय्यक यांना अर्वाच्य, असंस्कृत भाषा वापरल्याचे निर्दशनास आल्याने व महावितरण कंपनीची जनमानसातील प्रतिमा मलिन होत असल्याकारणाने तसेच, सदर बाब गंभीर स्वरुपाच्या गैरकृत्यामध्ये मोडत असल्याने सहाय्यक अभियंता, सिडको यांना दि.०९.०५.२०२३ रोजी निलंबित करण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विदर्भातील वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प तातडीने सुरु करण्याबाबत**

**(२५) ६५६०१ (०३-०९-२०२३). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी कायमस्वरुपी सिंचनाच्या सुविधेसाठी तातडीने ६० हजार कोटींचा वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प सुरु करण्याची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नदीजोड प्रकल्पामुळे सुमारे ४ लाख हेक्टर जमीन ही सिंचनाखाली येऊन पश्चिम विदर्भ सुजलाम सुफलाम होऊ शकतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर प्रकल्पास निधीची तरतूद करुन प्रकल्प तातडीने सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०१-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे. विदर्भातील अवर्षण प्रवण भागात सिंचन / बिगर सिंचनासाठी पाणी देवून सिंचन अनुशेष कमी करणे व शेतक-यांना सिंचन सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी वैनगंगा-नळगंगा नदिजोड प्रकल्पाचा रु.८८,५७५ कोटी अंदाजपत्रकीय किंमतीच्या प्रशासकिय मान्यता प्रस्तावास मान्यतेची कार्यवाही प्रगतीत आहे

होय, खरे आहे.

(२) या नदीजोड प्रकल्पामुळे सुमारे ३,७१,२७७ हेक्टर जमीन ही सिंचनाखाली आणण्याचे नियोजन आहे.

(३) वैनगंगा-नळगंगा नदीजोड योजनेच्या सविस्तर प्रकल्प अहवालाची राज्य तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांचेकडून छाननी पूर्ण झालेली आहे. तद्नंतर राज्य तांत्रिक सल्लागार समितीच्या छाननी अहवालातील मुद्यांच्या अनुपालन अहवालासोबत प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेकरिता शासनास प्राप्त झाला आहे. तथापि, शासन निर्णय दि. २३/११/२०१६ नुसार २००० हेक्टर पेक्षा मोठ्या उपसा सिंचन योजना शासकीय खर्चाने हाती घेण्यासाठी मान्यता देण्याचे अधिकार मा. मुख्यमंत्री यांना आहेत. त्यानुसार, सदर योजनेसाठी मा. मुख्यमंत्री महोदयांची मान्यता प्राप्त झाली आहे. तसेच, सदर प्रकल्पास, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ कलम ११ (च) अंतर्गत महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची मान्यता घेणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर मान्यतेसाठीचा प्रस्ताव क्षेत्रीय कार्यालयामार्फत महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांना सादर करण्यात आला असून त्यांचे अंतर्गत छाननी प्रगतित आहे. सदर प्रकल्पास महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांची मान्यता प्राप्त झालेनंतर राज्याच्या अर्थोपायाची स्थिती व मा. राज्यपाल यांचे निदेशानुसार प्रशासकीय मान्यता प्रदान करणे शक्य आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**बोंडार हवेली(जि.नांदेड) या गावातील दलित तरुणाच्या झालेल्या हत्येबाबत**

**(२६) ६६००४ (२७-०९-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोंडार हवेली (जि.नांदेड) या गावातील अक्षय भालेराव या युवकाचा भीम जयंती साजरी केली म्हणून निर्घृणपणे हत्या करण्यात आली असल्याचे माहे जून २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी सात उच्चवर्णीय नागरीकांना हत्येच्या आरोपांमध्ये अटक करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुरोगामी विचारांच्या राज्यात मोठया प्रमाणात दलितांवर अत्याचाराच्या घटना घडत असल्याने याबात शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, सदर चौकशी अन्वये दलितांवर होणाऱ्या अत्याचाराच्या घटना रोखण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०१-२०२४) :** (१) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन नांदेड (ग्रामीण) येथे गु. र. नं. ३९२/२०२३ कलम ३०२, ३०७, ३२४, ३२३, ११४, ११५, ३३६, २९४, १४३, १४७, १४८, १४९, ५०४ भा.दं.वि. सहकलम ३(१)(r)(s),३(२)(v),३(२)(va) अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा सहकलम ४/२५, ४/२७ शस्त्र अधिनियम, सहकलम १३५ महाराष्ट्र पोलीस कायदा अन्वये दिनांक ०२.०६.२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(२) व (३) सदर गुन्ह्यात आतापर्यंत एकूण ९ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच सदर प्रकरणी दोषारोप नंबर २३७/२०२३ अन्वये दिनांक १४.०७.२०२३ रोजी मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले असून सदर गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
(४) अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती अत्याचार प्रतिबंध कायद्याची प्रसिद्धी व प्रभावी अंमलबजावणीकरिता परिक्षेत्र व जिल्हा पातळीवर पोलीस अधिका-यांची नागरी हक्क संरक्षण विभागामार्फत कार्यशाळा घेण्यात येते.

दोषसिद्धीचे प्रमाण वाढविण्याकरिता गंभीर गुन्ह्यांमध्ये विशेष सरकारी अभियोक्ता यांची नेमणूक करण्याबाबत सर्व घटक प्रमुख यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

राज्यात सध्या ६ ठिकाणी अनन्य विशेष न्यायालये स्थापन करण्यात आली आहेत.

घटनास्थळी शांतता राखण्यासाठी व अत्याचाराच्या घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी समाजातील विविध घटकांच्या जातीय सलोखा बैठका घेण्यात येतात.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबईतील उमरखाडी येथील "पीएमपीजी" इमारतींच्या पुनर्विकासाबाबत

**(२७) ६६१९१ (१०-१०-२०२३) श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत म्हाडाने बांधलेल्या अनेक पुनर्रचित इमारतींत देखभाल, दुरुस्तीचा विषय गंभीर झाला असून मुंबईतील उमरखाडीसह पिंपळेश्वर येथील सोसायट्यांमधील काही घरांमध्ये पडझड झाल्याच्या दुर्घटना घडल्याचे माहे मे, २०२३ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इमारतींचे आयुर्मान आणि देखभाल दुरुस्तीकडे म्हाडाकडून दुर्लक्ष होत असल्याने रहिवाशांना जीव मुठीत घेऊन रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबईत सुमारे ३० वर्षांपूर्वी राजीव गांधी निवारा प्रकल्पात (पीएमजीपी) बांधलेल्या इमारतींच्या पुनर्विकासाची प्रक्रिया रखडली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार सदर इमारतींचा पुर्नविकास व दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे (१४-०२-२०२४) :** (१) व (२) उमरखाडी येथील अष्टविनायक या इमारतीच्या छज्जाचा प्लास्टरचा काही भाग दि.१७.०४.२०२३ रोजी कोसळलेला आहे. तसेच पिंपळेश्वर कृपा या इमारतीतील गाळयांच्या छताच्या सिलिंगचे प्लास्टर पडणे, कॉलम बीम यांचे क्रॉकीट कव्हर / तळाचे प्लास्टर पडणे यासारख्या घटना घडलेल्या आहेत.

सदर इमारतीतील गाळे मालकी तत्वावर वितरीत केले गेले असल्याने, या इमारतीची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी ही या इमारतीतील भाडेकरु / रहिवाश्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांची आहे. तथापि, आवश्यकतेनुसार दुरुस्ती करण्याकरिता शासनाने विशेष बाब म्हणून दि.१८.११.२०१३ रोजीच्या पत्रान्वये रुपये ९० कोटी ५ वर्षाकरिता उपलब्ध करुन दिला होता. त्यानुसार या ६६ इमारतीची आवश्यकतेनुसार दुरुस्ती सन २०१३ ते सन २०२२ या कालावधीत करण्यात आलेली आहे. जिल्हाधिकारी, मुंबई शहर जिल्हा यांना दि.०३.०७.२०२३ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा नियोजन निधी अंतर्गत रुपये ७५ कोटी निधी विशेष बाब म्हणून उपलब्ध करून देण्याबाबत मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने विनंती केलेली आहे.

(३) व (४) ६६ इमारतीपैकी २० इमारतीच्या ०६ समुह पुनर्विकास योजना प्रायोगिक तत्वावर राबविण्यासाठी प्राधिकरणाने दि.११.०७.२०१७ रोजीच्या बैठकीत तत्वतः मान्यता दिलेली आहे. त्याअनुषंगाने दि.०८.०७.२०२१ रोजीच्या सुधारित विकास नियंत्रण नियमावली ३३(९) नुसार व्यवहार्यता पडताळणी अहवाल तयार करण्याचे काम म्हाडाच्या स्तरावर सुरु आहे.

दि.०८.०७.२०२१ रोजीच्या शासनाच्या अधिसुचनेअंतर्गत पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत बांधलेल्या इमारतींचा पुनर्विकास विकास नियंत्रण नियमावली ३३(७) व ३३(९) अंतर्गत करण्याची तरतुद करण्यात आलेली आहे. या तरतुदीनुसार, भाडेकरु / रहिवाश्यांनी आवश्यक संमतीपत्रासह पुनर्विकासाचा प्रस्ताव सादर केल्यास, त्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र देता येऊ शकेल. परंतू अद्यापपर्यंत कोणत्याही इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रस्ताव प्राप्त झालेला नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालाड,मुंबई येथे केवळ महिलांकरिता शैक्षणिक भूखंड आरक्षित करुन महाविद्यालय सुरु करण्याबाबत**

**(२८) ६६२२७ (३१-०८-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालाड पश्चिम मुंबई येथील मालवणी येथे म्हाडाने सर्वे क्रमांक २६३ मध्ये जागतिक बँक प्रकल्प योजनेमध्ये नियोजनात्मक तरतुदीनुसार योजनेमध्ये सुविधा भूखंडामध्ये शैक्षणिक सुविधे करिता २ प्राथमिक शाळा ३ संयुक्त शाळा व एक महाविद्यालय असे सहा भूखंड नियोजित केले असून मात्र केवळ महिलांकरिता अशा प्रयोजनार्थ भूखंड आरक्षित नाही,हे खरे आहे काय

(२) असल्यास, केवळ महिलांसाठी महाविद्यालय भूखंड म्हाडाने आरक्षित करून सुरू करण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधीने दिनांक ०६ जून, २०२३ रोजी वा त्या सुमारास माननीय मुख्यमंत्री व गृहनिर्माण मंत्री यांच्याकडे वारंवार मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, फक्त महिलांसाठी महाविद्यालय भूखंड म्हाडाने आरक्षित करून सुरू करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे (१३-०२-२०२४) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

जागतिक बॅक प्रकल्प योजनेतंर्गत मालवणी, मालाड (प.) येथे महाविद्यालयासाठी भूखंड नियोजित आहे. सदर भूखंडाची म्हाडामार्फत सोडतीद्वारे विक्री करण्याचे प्रस्तावित आहे.

तथापि, महिला महाविद्यालयासाठी म्हाडाने स्वतंत्र भूखंड आरक्षित ठेवलेला नाही. म्हाडाकडून सोडत प्रक्रियेअंती ज्या संस्थेस/व्यक्तीस भूखंड मिळेल ती व्यक्ती/संस्था त्या भूखंडावर केवळ महिलांसाठी किंवा पुरुष व महिला अशा दोघांकरीता महाविद्यालय सुरु करु शकेल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुण्यामध्ये एका आंतरराष्ट्रीय टोळीतर्फे होत असलेली अंमली पदार्थाची विक्री**

**(२९) ६७०१७ (२७-०९-२०२३). श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यामध्ये एका आंतरराष्ट्रीय टोळीतर्फे अंमली पदार्थ्याची विक्री होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर अंमली पदार्थ विरोधी विभागाने पुण्यातून तीन जणाना अटक केल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू अंमली पदार्थ आंध्र प्रदेश आणि बिहार येथून पुण्यामध्ये येत असल्याचे आढळून आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने संबधितावर कोरणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे,

पुणे शहर पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रामध्ये माहे मे,२०२३ मध्ये अंमली पदार्थ विरोधी पथक,गुन्हे शाखा पुणे शहर कडून अशा प्रकारे आंतराष्ट्रीय टोळी पकडण्यात आलेली नाही. परंतु अंमली पदार्थ विरोधी पथक,गुन्हे शाखा, पुणे शहर यांच्याकडून चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन हद्दीत अंमली पदार्थ विक्री करत असताना एक परदेशी नागरिकास अटक करण्यात आली असुन चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन येथे गु. र. नं. ३१७/२०२३ एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८(क),२१(ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे व दोषारोपपत्र मा. न्यायालयात सादर केले आहे.

(२) नाही,

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी येथे शासन आपल्या दारी या कार्यक्रमास अंध, अपंग, दिव्यांगांसह कामगार, शेतकरी, बचतगटांच्या महिलांना सक्तीने बोलाविल्याबाबत**

**(३०) ६७०५८ (०१-०९-२०२३). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी येथे ‘शासन आपल्या दारी’ हा कार्यक्रम मा. मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत दि. २५ मे २०२३ रोजी आयोजित करण्यात आला असून, सदर कार्यक्रमासाठी जिल्हयातील अंध, अपंग, दिव्यांगांसह कामगार, शेतकरी, बचतगटांच्या महिलांसह जिल्हाभरातील सर्व शासकीय कर्मचाऱ्यांना सक्तीने आणण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खारघर येथे दि. १६ एप्रिल २०२३ आयोजित महाराष्ट्र भूषण सन्मान प्रदान कार्यक्रमात उष्माघाताने १३ श्रीसेवकांच्या मृत्यूची घटना ताजी असताना आणि ४० डीग्री सेल्सियसहून अधिक तापमान असताना ‘शासन आपल्या दारी’हा कार्यक्रम आयोजित करून गर्दी जमविण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर कार्यक्रमाला एकूण किती लाभार्थी शासकीय खर्चाने आणण्यात आले, लाभार्थ्यांना कार्यक्रमस्थळी आणण्यासाठी कोणती व्यवस्था करण्यात आली होती, वाहतूक व्यवस्थेसह संपूर्ण कार्यक्रमासाठी किती खर्च करण्यात आला आणि एकूण किती लाभर्थ्यांना दाखले प्रदान करण्यात आले,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (२८-११-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) शासकीय योजना लोकाभिमुख करुन त्याची अंमलबजावणी गतिमान करण्यासाठी शासनाने ‘शासन आपल्या दारी’ हे अभियान राबविण्याचे ठरविले आहे. या अभियानांतर्गत नागरिकांना शासकीय योजनांशी निगडीत कार्यालयाचे

प्रतिनिधी व विविध दस्तऐवज उपलब्ध करून देणारे अधिकारी व कर्मचारी यांना एका छताखाली एकत्र आणून विविध योजनांचे लाभ प्रदान करणे अभिप्रेत आहे. त्या दृष्टीने रत्नागिरी येथील नागरिकांसाठी दि.२५ मे २०२३ रोजी 'शासन आपल्या दारी' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

(३) सदर कार्यक्रमाला रत्नागिरी जिल्हयातून एकूण १९८०९ लाभार्थी उपस्थित होते. त्यापैकी १६३५७ लाभार्थ्यांना शासकीय खर्चाने आणण्यात आले होते. सदर लाभार्थ्यांना ने-आण करणेसाठी एस.टी. बसेसची व्यवस्था करणेत आलेली होती. 'शासन आपल्या दारी या कार्यक्रमाच्या अनुषंगाने विविध योजना अंतर्गत प्रमाणपत्र स्वरूपात लाम दिलेल्या पुरुष व स्त्री लाभार्थ्यांची संख्या ८७७५ इतकी आहे. तसेच विविध योजनांतर्गत आर्थिक स्वरुपात देण्यात येणाऱ्या पुरुष व स्त्री लाभार्थ्यांची संख्या ११७७७ इतकी असून एकूण २०५५२ लाभार्थ्यांना लाभ देणेत आलेला आहे. संपूर्ण कार्यक्रमासाठी रु.१,८६,५०,८२९/- (अक्षरी रुपये एक कोटी शहाऐंशी लाख पन्नास हजार आठशे एकोणतीस मात्र) इतका खर्च झालेला आहे.

(४) व (५)या प्रकरणी कोणतीही जीवित वा वित्त हानी झाली नसल्याने चौकशी वा कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**इंदिरा नगर (ता.चिमूर, जि.चंद्रपूर) झोपडपट्टीत राहणाऱ्या मजुराला अवाजवी वीज देयक प्राप्त झाल्याबाबत**

**(३१) ६७२४४ (२७-०९-२०२३). श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंदिरा नगर (ता.चिमूर, जि.चंद्रपूर) झोपडपट्टीत राहणाऱ्या मजुराला १९,८४० रुपयाचे वीज देयक प्राप्त झाल्याचे माहे २०२३ , मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त परिसरातील झोपडपट्टीत राहणाऱ्या मजुराचे घर पत्र्याच्या शेडचे असून घरात एक बल्ब व पंख्याशिवाय एकही उपकरण नसतानाही महावितरणने १२५३ युनिटचा वापर दाखवून १९,८४० रुपयाचे बिल पाठविले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त परिसरातील झोपडपट्टीत राहणाऱ्या विदयुत ग्राहकाने दि. १७ एप्रिल २०२३ व दि. ०८ मे २०२३ रोजी मीटरमध्ये तांत्रिक बिघाड असल्याने योग्य चौकशी करून मीटर बदलविण्याकरीता दोन वेळा अर्ज करूनही बदलविण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन झोपडपट्टीत रहाणाऱ्या मजुराचा मीटर बदलून त्याल आलेले जास्तीचे वीज देयक माफ करण्याबाबत तसेच जिल्हयासह संपूर्ण राज्यात असे तांत्रिकदृष्ट्या खराब व बऱ्याच वर्षापासून नादुरुस्त असलेले विदयुत मीटर तातडीने बदलविण्याबाबत धडक मोहीम राबविण्यातबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०१-२०२४) :** (१) व (२) हे खरे आहे,

माहे एप्रिल, २०२३ मध्ये सदर वीज ग्राहकास त्याच्या वीज मीटरवर नोंद झालेल्या रिडींग चे वीज देयक देण्यात आले आहे. सदर वीज ग्राहकाच्या मीटर वर रिडींग असल्याने त्यास रिडींग नुसार वीज देयक देण्यात आले होते.

(३) व (४) बाबत,

सदर वीज ग्राहकाच्या मीटरची तपासणी केल्यानंतर वीज मीटर सदोष आढळल्यामुळे सुधारित देयक देण्यात आले आहे. तसेच, वीज मीटरच्या उपलब्धतेनुसार दि.१२.०६.२०२३ रोजी सदर ग्राहकाचे वीज मीटर देखील बदलण्यात आले आहे.

महावितरणमार्फत नवीन वीज जोडणी तसेच जुने व नादुरुस्त मीटर बदलविण्यासाठी नियमितपणे मीटरची खरेदी ई-निविदेच्या माध्यमातून करण्यात येते. त्यानुसार, महावितरणमार्फत नादुरुस्त वीज मीटर बदलून, नवीन वीज मीटर उपलब्ध करुन देण्याकरिता मीटर पुरवठ्याबाबत कार्यादेश देण्यात येतात. तसेच, भविष्यातील वीज मीटरची गरज विचारात घेता महावितरणमार्फत १८ लाख नवीन सिंगल फेज मीटरच्या खरेदीसाठीची निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आली असून, मीटरच्या उपलब्धतेनुसार उर्वरित नादुरुस्त वीज मीटर बदली करण्याचे काम सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई म्हाडा सोडतीतील घरे ज्या लाभार्थ्यांच्या नावे लागली आहेत त्यांना ती उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३२) ६७५५१ (०३-०९-२०२३). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडाचे मुंबई मंडळाच्या ४ हजार ८३ घरांच्या सोडतीसाठी अर्ज विक्री स्वीकृती प्रक्रिया सुरू करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी यापूर्वी म्हाडा वा सिडकोसह इतर सरकारी योजनेतील घरांच्या लाभार्थ्यांना म्हाडाची किंवा इतर कोणत्याही सरकारी योजनेत दुसरे घर घेता येणार नसल्याची बाब माहे मे, २०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सन २०१९ च्या आदेशाची अंमलबजावणी करुन सोडतीतील घरे ज्या लाभार्थ्यांच्या नावे लागली आहेत त्यांना ती उपलब्ध करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (१३-०२-२०२४) :**(१) मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने विविध वसाहतीमधील एकूण ४०८२ सदनिकांच्या विक्रीकरीता दि.२२/५/२०२३ रोजी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिद्ध केली आहे.

(२) व (३) गृहनिर्माण विभागाच्या दि.११/९/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासकीय गृहनिर्माण योजनेतील घर धारण करीत असलेल्या व्यक्तीस त्या किंवा अन्य कोणत्याही शासकीय गृहनिर्माण योजनेत दुसरे घर अनुज्ञेय न करण्याबाबतचे धोरण निश्चित करण्यात आले आहे.

मुंबई मंडळाद्वारे प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये उक्त शासन निर्णयातील अटी व शर्ती नमूद करण्यात आलेल्या आहेत. सोडतीमध्ये अर्जदार यशस्वी ठरल्यानंतर त्यांच्याबाबतीत सदर शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार म्हाडाच्या मुंबई मंडळाकडून पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तिवसा (जि. अमरावती) तालुक्यातील पैसे भरुनही कृषी वीज जोडणी दिली नसल्याबाबत**

**(३३) ६८०५१ (०१-०९-२०२३). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिवसा (जि. अमरावती) तालुक्यातील श्री. कैलाश साहेबराव चापके, रा. पुर्णानगर यांनी कृषि वीज जोडणी करीता आवश्यक त्या कागदपत्राची पुर्तता तसेच डिमांट नोटने आवश्यक पैसाची भरणा दिनांक २९/५/२०१७ रोजी केली असुनही अद्यापही त्यांना वीज जोडणी मिळाली नसल्याचे माहे जुन, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री. कैलास चापके यांना कृषी विज जोडणी करीता भरलेल्या रकमेचा कालावधी लक्षात घेता त्यांना तात्काळ वीज जोडणी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०१-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) श्री. कैलास साहेबराव चापके, रा. पुर्णानगर यांनी नवीन कृषीपंप वीज जोडणीसाठी पैसे भरणा केले होते. त्यांच्या विहीरीच्या कृषीपंपाचे उच्चदाब वाहिनी पासूनचे अंतर १५०० मीटर आहे. अमरावती मंडळाकडून जिल्हा नियोजन समितीला दि.१७.०५.२०२२ नुसार ६०० मीटर पेक्षा जास्त अंतर असणाऱ्या कृषीपंपाकरिता निधीची मागणी करण्यात आलेली आहे. परंतू, सदरचा निधी अप्राप्त आहेत.

तसेच, शासनाच्या धोरणानुसार ६०० मीटर पेक्षा जास्त अंतर असलेल्या कृषीपंपाना अपारंपारीक (सौर) ऊर्जेव्दारे वीजपुरवठा करण्याची तरतूद आहे. मात्र ग्राहक हा सौर कृषीपंप कनेक्शन घेण्याकरिता इच्छुक नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. सदर ग्राहकाने कृषीपंप वीज धोरण २०२० अंतर्गत पुन्हा दि.२१.०६.२०२३ रोजी अर्ज केला आहे. सदर ग्राहकांच्या अर्जावर कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२० नुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बदनापुर, अंबड, भोकरदन (जि.जालना) तालुक्यातील HVDS योजने अंतर्गत १६ केव्ही रोहित्र बसविण्याबाबत

**(३४) ६८१९० (२७-०९-२०२३). श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदनापुर, अंबड, भोकरदन (जि.जालना) तालुक्यातील HVDS योजने अंतर्गत १६ केव्ही रोहित्र बसविण्याची कामे सुरू आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांनी त्यांचे कोटेशन सन २०२१ मध्ये भरलेले असुन देखील अद्याप त्यांची एक शेतकरी- एक रोहित्र मंजूर न होता, त्यांच्या नंतर सन २०२२ मध्ये कोटेशन भरणा केलेल्या शेतकऱ्यांची मंजुरी झाली असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महावितरण विभागाचे उपअभियंता, शाखा अभियंता, तसेच संबधीत गावाचे लाईमन आणि संबंधित एजन्सी १. मे. युनिसोर्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड, करमाळा, २.मे. रुद्रा इलेक्ट्रिकल्स जालना, ३. मे. घांडगे पाटील पॉवरटेक प्रा.लि., ४.मे. रॉयल इन्टरप्राईजेस प्रा. लि. येवला ५. मे. गुरुकृपा इलेक्ट्रीकल्स प्रा. लि. जालना यांनी प्रत्येकी शेतकऱ्यांकडून १५-२० हजार रुपये घेऊन रोहित्र मंजुर केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास,जालना जिल्ह्यातील बदनापुर, अंबड आणि भोकरदन तालुक्यामध्ये HVDS १६ केव्ही रोहित्र बसविण्यामध्ये शेतकऱ्यांकडून पैसे घेतल्याजाणाऱ्या महावितरण विभागाचे उपअभियंता, शाखा अभियंता, तसेच संबधीत गावाचे लाईमन आणि संबंधित एजन्सी यांच्यावर कारवाई करण्यात येऊन एजन्सी रद्द करण्यात यावी अशी मागणी शेतरीवर्गामधून करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०१-२०२४) :** (१) हे खरे आहे,

महावितरण कंपनीच्या जालना मंडळ कार्यालयांतर्गत बदनापूर, अंबड व भोकरदन तालुक्यामध्ये जुलै २०२१ पर्यंत पैसे भरुन प्रलंबित असलेल्या कृषीपंपांना कृषीपंप वीज जोडणी धोरण २०२० अंतर्गत उच्चदाब वितरण प्रणालीवर १६ केव्हीए रोहित्राद्वारे वीज जोडणी देण्याकरिता मे. युनिसोर्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड, करमाळा, मे. रुद्रा इलेक्ट्रिकल्स प्रा.लि., जालना, मे. घांडगे पाटील पॉवरटेक प्रा.लि., मे. रॉयल इन्टरप्राईजेस प्रा.लि. जालना व मे. गुरुकृपा इलेक्ट्रीकल्स प्रा. लि. जालना यांची नेमणूक करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही,

याबाबत, कृषीपंप ग्राहकांनी पैसे भरल्याच्या दिनांकास अनुसरुन जेष्ठता यादीनुसार कृषीपंप वीज जोडणी देण्यात येत आहे.

(३) याबाबत बदनापूर-अंबड विधानसभा मतदार संघाचे विधानसभा सदस्य यांचा दि. १२.०६.२०२३ रोजीचा तक्रार अर्ज महावितरणच्या जालना मंडळ कार्यालयास प्राप्त झाला आहे.

(४) याबाबत, सरपंच व उपसरपंच ग्रामपंचायत जवसगाव यांनी उप कार्यकारी अभियंता, बदनापुर यांचेकडे दि.०८.०६.२०२३ रोजी तक्रार अर्ज दाखल केला होता. त्यानुषंगाने, उप कार्यकारी अभियंता, बदनापुर यांनी त्यांची भेट घेऊन चौकशी केली असता त्यांनी सदर तक्रार चुकीने देण्यात आल्याचे तसेच याबाबत कोणताही आक्षेप नसल्याचे लेखी स्वरुपात कळविले आहे.
(५) सदर प्रकरणाची शहानिशा करण्यासाठी अधिक्षक अभियंता, जालना मंडळ कार्यालय यांनी चौकशी समिती गठीत केलेली आहे. सदर समितीचा अहवाल प्राप्त झाल्यावर संबंधितांवर महावितरण कंपनीच्या नियमानुसार व निविदेतील अटी व शर्तीच्या नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

---

**महारेराचा क्रमांक नसतांनाही गृहनिर्माण प्रकल्पांनी जाहीराती छापल्याबाबत**

**(३५) ६८५७० (०३-०९-२०२३). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महारेराचा क्रमांक नसतांनाही गृहनिर्माण प्रकल्पांनी जाहीराती छापलेबाबतची बाब माहे एप्रिल, २०२३, मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्थावर संपदा कायद्यानुसार ५०० स्क्वेअर मीटरपेक्षा जास्त किंवा ८ सदनीकांचा कुठलाही प्रकल्प असल्यास त्याची महारेराकडे नोंदणी आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महारेरा नोंदणीक्रमांक असल्याशिवाय कुठल्याही विकासकाला प्रकल्पाची जाहीरात, घरांची नोंदणी, विक्री करता येत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महारेरा क्रमांकाशिवाय अशा किती गृहनिर्माण प्रकल्पांनी जाहीराती छापल्या आहे अशा महारेराची नोंदणी नसलेल्या गृहप्रकल्पांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (१४-०२-२०२४) :**१), २) व ३) हे खरे आहे.
४) महारेरा क्रमांकाशिवाय गृहनिर्माण प्रकल्पांची जाहिराती छापल्याचे २२० प्रकरणे प्राप्त झाली असून, १७३ प्रकरणांवर सुनावणी घेण्यात आली आहे. त्यापैकी ८७ प्रकरणांवर दंडात्मक कार्यवाही करण्यात आली असून, रु.१६,९०,०००/- एवढी रक्कम वसूल करण्यात आली आहे. उर्वरित प्रकरणांवर कार्यवाही सुरु आहे.
५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरातील कोरेगाव पार्क मध्ये स्पा सेंटरमध्ये वेश्याव्यवसाय सुरू असल्याबाबत**

**(३६) ६९०४८ (२७-०९-२०२३). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील कोरेगाव पार्क परिसरात स्पा सेंटरच्या नावाखाली वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्पा सेंटरमध्ये पोलिसांनी धाड टाकून वेश्या व्यवसाय उघडकीस आणल्याचे माहे मार्च २०२३मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा विभागाने दोन महिन्यात कोरेगाव पार्क परिसरातील मसाज पार्लर आणि स्पा सेंटरमध्ये छापा टाकून सात परदेशी तरुणीसह बारा पीडित तरुणीची सुटका केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींनी अवैध धंदे बंद करण्याबाबत वेळोवेळी शासनाकडे मागणी करुन देखील प्रशासन याकडे दुलर्क्ष करीत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अवैध धंदे बंद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०१-२०२४) :** (१) सदरबाबत पूणे शहर पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील कोरेगाव पोलीस स्टेशन येथे अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३,४,५ व भा. दं. वि. कलम ३७०, ७४ अन्वये दि. १४.०२.२०२३ रोजी गु. र. नं. २६/२०२३ अन्वये व दिनांक १८.०३.२०२३ रोजी गु. र. नं. ४५/२०२३ अन्वये असे दोन गुन्हे दाखल आहेत
(२) वर नमूद दोन्ही गुन्ह्यांमध्ये एकूण १० तरुणींची सुटका करण्यात आली असून त्यात ४ परदेशी महीलांचा समावेश आहे.
(३) व (४) पोलीसांद्वारे वेळोवेळी मसाज पार्लर व स्पा सेंटरला अचानक भेटी देऊन सदर ठिकाणी कोणताही अवैध व्यवसाय चालू राहणार नाही याची दक्षता घेतली जाते. तसेच त्याही ठिकाणी अवैध व्यवसाय मिळुन आल्यास त्यावर तात्काळ परिणामकारक कारवाई करण्याबाबत तजवीज केली जाते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जिल्हा वार्षिक योजना सन २०२२-२३ बीड अंतर्गत कामांच्या प्रशासकीय मान्यतेमध्ये झालेल्या अनियमिततेबाबत

**(३७) ६९०७१ (३१-०८-२०२३). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड नगरपालिकेला दलितोत्तर नगरोत्थान जिल्हास्तर लोकशाहीर आण्णाभाऊ साठे तसेच बीड व शिरूर (का) तालुक्यातील जिल्हा वार्षिक योजना सन २०२२-२३ अंतर्गत ग्रामीण भागात जनसुविधा, नाविन्यपूर्ण योजना, ३०५४, ५०५४ पायाभूत विकास योजना व इतर लेखाशीर्ष अंतर्गत मोजक्या प्रमाणात निधी मान्यता मिळालेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा वार्षिक योजनेमध्ये दिनांक २९ व ३० मार्च, २०२३ पर्यंत मंजूर असलेल्या नियतव्ययाच्या आधारे प्रशासकीय मान्यता होत असताना मोठ्या प्रमाणात अनियमितता झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सुचवलेल्या व सार्वजनिकरित्या अत्यंत महत्त्वाची असलेल्या कामांना मंजुरी न देता ठराविक मतदारसंघांमध्ये जास्त प्रमाणात निधी वाटप झाले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर निधीअंतर्गत सर्व कामांची निविदा ही जीएम पोर्टलवर स्पर्धात्मक होणे गरजेचे असताना सुद्धा तशा प्रकारच्या निविदा झालेल्या नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, जिल्हा वार्षिक योजना सन २०२२-२३ अंतर्गत झालेल्या प्रशासकीय मान्यतेवरील कामांना नियतव्यास मुदतवाढ देऊन झालेल्या सर्व प्रशासकीय मान्यतेची विभागणीहाय व संचिकानिहाय त्रयस्थ समितीमार्फत उच्चस्तरीय चौकशी व्हावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री आणि अप्पर मुख्य सचिव नियोजन विभाग यांना त्यांचे दिनांक ३१ मार्च, २०२३ रोजीच्या पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी लोकप्रतिनिधी यांनी पत्राद्वारे केलेल्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (०१-१२-२०२३) :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही
(५) व (६) हे खरे आहे
लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी चौकशी केली असून, कोणतीही अनियमितता झाली नसल्याचा अहवाल संबंधितांना पाठविला आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही

---

## धाराशिव (उस्मानाबाद) जिल्ह्यातील जिल्हा परिषदेकडील कोल्हापूर पद्धतीच्या बंधारे दुरुस्ती करीता निधी मंजूर करणेबाबत

**(३८) ६९२२५ (३०-०८-२०२३). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर)** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धाराशिव (जि.उस्मानाबाद) जिल्हा परिषदेकडील कोल्हापूर पद्धतीच्या बंधारे दुरुस्तीकरीता रुपये ४१.५० कोटी निधी मंजूर करण्यासाठी **Error! Not a valid link.**यांनी दिनांक १८ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धाराशिव (उस्मानाबाद) जिल्ह्याचे अल्प पर्जन्यमान विचारात घेऊन तत्कालीन पाटबंधारे मंत्री यांनी जिल्ह्यात १००० हून अधिक कोल्हापूर पद्धतीचे बंधारे बांधले असून, यातील ६७१ कोल्हापूर पद्धतीच्या जिल्हा परिषदेकडील बंधाऱ्यांची मागील अनेक वर्षापासून दुरुस्ती न झाल्याने ही करोडो रुपयांची मालमत्ता पूर्ण क्षमतेने उपयोगात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यातील अनेक बंधाऱ्यांना गेट नाहीत, काहींची स्थापत्य दुरुस्ती अत्यावश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या बंधाऱ्यांची दुरुस्ती केल्यास जिल्ह्यातील सिंचन क्षेत्रामध्ये मोठी वाढ होऊ शकते, तसेच भूगर्भ पातळीतील जलसाठ्यामध्ये देखील वाढ होऊ शकते त्यामुळे जिल्हा परिषद लघु पाटबंधारे विभाग, उस्मानाबाद यांच्याकडून या ६७१ कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांच्या दुरुस्तीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यासाठी रु. ४१.५० कोटीची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, धाराशिव (उस्मानाबाद) जिल्ह्यातील कोल्हापूर पद्धतीच्या ६७१ बंधारे दुरुस्तीकरीता रु. ४१.५० कोटी निधी मंजूर करण्याबाबत मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उपरोक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय राठोड (०२-०२-२०२४) :** (१) नाही
तथापि, नादुरुस्त बंधारे दुरुस्त करण्याबाबत लोकप्रतिनिधी व ग्रामस्थ यांची विभागाकडे सतत मागणी होत आहे.
(२) धाराशिव जिल्हयात जि.प. (ल.पा.) विभागाकडे एकूण ९२० कोल्हापूरी पध्दतीचे बंधारे असून त्यापैकी दुरुस्ती आवश्यक असलेल्या ६७१ बंधा-यापैकी ५९ को.प. बंधा-यांना जिल्हा वार्षिक योजना सन २०२१-२२ व २०२२-२३ मध्ये प्रशासकीय मान्यता प्राप्त असून त्यापैकी १४ कामे पूर्ण करण्यात आली आहेत. व उर्वरित ४५ कामे प्रगतीपथावर आहेत.

तसेच सन २०२३-२४ मध्ये ९७ कोल्हापूरी बंधा-यांच्या कामांना अटल भूजल योजनेंतर्गत प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून असून २७ कामांना कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत. व उर्वरित ७० कामे निविदा स्तरावर आहेत.

उर्वरित को. प. बंधा-यांबाबतची कार्यवाही विभागीय स्तरावर प्रगतीत आहे. सदर बंधा-याच्या दुरुस्तीकरीता रु. ३१.३७ कोटी निधीची आवश्यकता असून निधी प्राप्त झाल्यावर दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येईल.
(३) नादुरुस्त ६७१ कोल्हापूर बंधा-यांपैकी ३५८ बंधा-यांना गेट दुरुस्ती व नवीन गेट आवश्यक असून ३१३ बंधा-यांना स्थापत्य दुरुस्तीसह गेट दुरुस्ती व नवीन गेट आवश्यक आहे.
(४) (५) व (६) होय.

कोल्हापूरी पध्दतीच्या बंधा-याबाबतची कार्यवाही विभागीय स्तरावर प्रगतीत आहे.

---

**संगमनेर, (ता. भोर, जि पुणे) येथील अल्पवयीन मुलींची रस्त्यात छेडछाड होत असल्याबाबत**

**(३९) ६९३२० (२७-०९-२०२३). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), अ‍ॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.संजय जगताप (पुरंदर),** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमनेर (ता. भोर, जि पुणे) येथील मुली शिक्षणासाठी पायवाटेने जात असताना त्यांची वाटेत छेडछाड करण्यात येत असल्याने या अल्पवयीन मुली असुरक्षित असूनही पोलीस यांकडे दुर्लक्ष करीत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अल्पवयीन मुलींना संरक्षण देण्याबाबत तसेच या गंभीर प्रकाराकडे दुर्लक्ष करणा-या संबधित पोलीसावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०१-२०२४) :** (१) व (२) संगमनेर ता. भोर जि. पुणे येथे अल्पवयीन मुलीची छेडछाड केल्याची घटना घडली असून सदर प्रकरणी राजगड पोलीस स्टेशन येथे गु. र. क्र. १८९/२०२३, भादवि कलम ३५४, ३५४ ड, ३४१, ५०६ सह बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंध कायदा कलम ८, १२ अन्वये दिनांक २९/०४/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदर गुन्ह्यातील आरोपी हा विधीसंघर्षीत बालक असल्याने त्याचेविरुद्ध मा. बाल न्याय मंडळ, येरवडा, पुणे येथील न्यायालयात एससीसी नं. ४४०/२०२३ अन्वये दिनांक ०७.०७.२०२३ रोजी दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही

---

**नया नागपूर भागात सतत वीजपुरवठा खंडीत होत असल्याबाबत**

**(४०) ६९४३१ (२७-०९-२०२३). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नया नागपूर भागात मोठया प्रमाणात बहुमजली इमारती असून लोकसंख्येच्या मानने वीजपुरवठा केला जात नसल्यामुळे वारंवार वीज खंडीत होत असल्याची बाब माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान उघडकीस आले, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करुन नया नागपूर येथील वीजपुरवठा नियमित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०१-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे,

महावितरण कंपनीच्या नरेंद्रनगर, मनिषनगर, बेसा-बेलतरोडी, हुडकेश्वर हा भाग नया नागपूरमध्ये अंतर्भूत आहे. बेसा येथील १३२/११ के.व्ही.उपकेंद्रात दि.२१.०५.२०२३ रोजी दोन पॉवर रोहित्रांपैकी १ रोहित्र रात्री ११ वाजता नादुरुस्त झाला होता. त्यामुळे त्या रोहित्रांमधून वीज पुरवठा करणाऱ्या १३ पैकी ९ वाहिन्या बेसा उपकेंद्रातील दुसऱ्या पॉवर रोहित्रावर स्थलांतरित करण्यात आल्या होत्या. त्यामुळे, उर्वरित ४ वाहिन्यांचा वीज पुरवठा जवळच्या उपकेंद्रावर वळता

करण्यात आला होता. उन्हाळयामुळे वीजेच्या मागणीचा उच्चांक असल्यामुळे सदर वाहिन्यांवर दि.२५.०५.२०२३ पर्यंत चक्राकार पध्दतीने वीज पुरवठा करण्यात आला होता. सदर नादुरुस्त पॉवर रोहित्र दि.२५.०५.२०२३ ला बदलवून नवीन रोहित्र कार्यान्वित करण्यात आले व वीज पुरवठा सुरळीत करण्यात आला होता.

सदर भागात दि.२८.०५.२०२३ रोजी झालेल्या वादळी पावसामुळे सदर भागातील वीज पुरवठा काही वेळ खंडीत झाला होता तो सुरळीत करण्यात आला.

(२) नया नागपूर भागात दि. २८.०५.२०२३ रोजी झालेल्या वादळी पावसामुळे या परिसरातील उच्चदाब व लघुदाब वाहिन्यांवर जवळपास ४७ झाडे पडल्यामुळे १० वीज वाहिन्यांचा वीज पुरवठा खंडीत झाला होता. तसेच लघुदाब वाहिन्यांवर झाडांच्या फांदया तुटून पडल्यामुळे ८ विजेचे खांब व तारा तुटल्या होत्या. महावितरण कंपनीने खाजगी कंत्राटदारातर्फे अतिरिक्त मनुष्यबळ वापरुन व महावितरणच्या आजुबाजुच्या वितरण केंद्रातील अभियंता, कर्मचाऱ्यांच्या व अग्निशमन विभागाच्या मदतीने वीज पुरवठा सुरळीत करण्यात आला.

सदर भागात जिल्हा नियोजन समिती कार्यालयाकडून १५ नवीन रोहित्र व १२ रोहित्रांची क्षमता वाढ मंजूर करण्यात आली आहे, त्यापैकी ९ रोहित्रांचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच सुधारित वितरण क्षेत्र योजना प्रणाली सक्षमीकरण योजनेअंतर्गत शाहुनगर,बेसा व नरेंद्रनगर येथे नवीन ३३/११ के.व्ही. उपकेंद्रे प्रस्तावित करण्यात आली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उद्योगनगरीतील हिंदुस्तान अँटीबायोटिक कंपनीच्या वसाहतीतील एच ए शाळेतील वीज पुरवठा पुर्ववत करण्याबाबत

**(४१) ६९५४६ (२७-०९-२०२३). श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी (जि.पुणे) येथील हिंदुस्तान अँटीबायोटिक कंपनीच्या वसाहतीतील डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या एच ए शाळेतील वीज पुरवठा गेल्या २१ दिवसांपासून खंडित असल्याचे दिनांक १९ जून २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,वीज पुरवठा खंडीत झाल्यने शाळेतील सुमारे तीन हजार मुलांना अंधारात शिक्षण घ्यावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर शाळेचा वीज पुरवठा पूर्ववत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०१-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे,

मे. हिंदुस्तान अँटीबायोटिक कंपनी महावितरणचा उच्चदाब ग्राहक आहे. या कंपनीच्या वसाहतीत डेक्कन एज्युकेशन सोसायटीची एच.ए. शाळा आहे. या उच्चदाब ग्राहकाचा वीज पुरवठा महावितरणकडून खंडीत झालेला नाही. डेक्कन एज्युकेशन सोसायटीची शाळा मे. हिंदुस्तान अँटीबायोटिक कंपनीच्या अखत्यारीत येते. कंपनीच्या अंतर्गत कारणांमुळे शाळेचा वीज पुरवठा खंडित झालेला होता. अंतर्गत भागातील वीज बिघाड दुरुस्ती करण्याची जबाबदारी संबंधित कंपनीची असते.

(२) हे खरे नाही,

सदर वीज पुरवठा हा ग्राहकाच्या अंतर्गत बिघाडामुळे खंडित झाल्याचे निदर्शनास आले होते. हिंदुस्तान अँटीबायोटीक कंपनीने भुमीगत वीज वाहिनीची दुरुस्ती करुन शाळेचा वीज पुरवठा सुरळीत केलेला आहे.

(३) सदर कंपनीच्या अंतर्गत भागाच्या तपासणीमध्ये कंपनीची अंतर्गत भुमीगत वीज वाहिनी खराब झाल्यामुळे शाळेचा वीज पुरवठा खंडीत झाला असल्याचे निदर्शनास आले होते. हिंदुस्तान अँटीबायोटीक कंपनीने त्या भुमीगत वीज वाहिनीची दुरुस्ती करुन शाळेचा वीज पुरवठा सुरळीत केलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यभरात दहा लाख वीज मीटर मध्ये बिघाड झाल्याबाबत**

**(४२) ६९७०३ (२७-०९-२०२३). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर),), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरणने राज्यभरात लावलेल्या वीज मीटरपैकी ९.६० लाख मीटरमध्ये बिघाड असल्याचा महावितरणाच्या अहवालात खुलासा झालेला असून असल्याने सामान्य ग्राहकांना आर्थिक नुकसान सहन करावा लागणार आहे, हे खरे आहे काय,(२) असल्यास, मीटरमध्ये बिघाड असतांनाही महावितरण समायोजन करण्यास तयार नसल्याने चुकीच्या व अवास्तव रिडींगनुसारच ग्राहकांना आलेले हजारो रूपयांचे बिल भरावे लागत असल्याची बाब दिंनाक २० जून २०२३ रोजी निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, विदर्भात अशा बिघाड झालेल्या मीटरची संख्या २.२५ लाख असून त्यात नागपूर झोनमध्ये २५ हजार, गोदिया १२ हजार, चंद्रपूर २९ हजार, अमरावती ८० हजार, अकोला ७८ हजार तसेच संभाजीनगर विभागात २.४३ लाख, कोकण ३.२८ १.६३ लाख मिटरमध्ये बिघाड झाल्याचे निदर्शनास आले, आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, बिघाड झालेल मीटर बदलून देण्यास महावितरण कंपनीच्या अधिकारी तयार नसल्याने नवीन मीटर ग्राहकांना प्रति मीटर दोन हजार अधिक रुपयांने खरेदी खरेदी करावे लागत आहे हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बिघाड झालेले मीटर बदलून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०१-२०२४) :** (१) व (२) बाबत,

वीज मीटर उपकरण हे इलेक्ट्रॉनिक उपकरण असून त्यामध्ये ग्राहकांकडून छेडछाड केल्यामुळे तसेच विविध कारणांमुळे बिघाड होतो. माहे जून, २०२३ अखेर नादुरुस्त मीटरची संख्या एकूण ग्राहकांच्या ६.९५% इतकी आहे. मा.विद्युत नियामक आयोगाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे सदर ग्राहकांना त्यांच्या पुर्वीच्या वापरावर आधारित सरासरी वीज देयक देण्यात येते.

(३) विदर्भात अशा बिघाड झालेल्या मीटरची संख्या सुमारे ३.९८ लाख असून त्यात नागपूर झोनमध्ये ४८ हजार, गोंदिया २२ हजार, चंद्रपूर ४८ हजार, अमरावती १.४८ लाख, अकोला १.३२ लाख तसेच संभाजीनगर प्रादेशिक कार्यालयाअंतर्गत ४.६० लाख कोकण ६.०८ लाख व पुणे प्रादेशिक कार्यालयांतर्गत २.९० लाख आहे.

(४) व (५) बाबत,

महावितरण कंपनीमार्फत सदोष मीटर जेष्ठता यादीप्रमाणे कालबद्ध पद्धतीने बदलविण्यात येत असून, अशी नादुरुस्त मीटर बदलण्याची प्रक्रिया महावितरणमार्फत निरंतर सुरु असते. त्यानुसार प्रत्येक महिन्यात सदोष मीटर बदलण्यात येत आहेत. मा.महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाद्वारे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता, वितरण परवाना धारकांच्या कृतीची मानके आणि पॉवर क्वॉलिटी) विनियम, २०२१ अन्वये ग्राहकाला खुल्या बाजारातून मीटर घेण्याची सुविधा देण्यात आलेली आहे.

महावितरणमार्फत नवीन वीज जोडणी तसेच जुने व नादुरुस्त मीटर बदलविण्यासाठी नियमितपणे मीटरची खरेदी ई-निविदेच्या माध्यमातून करण्यात येते, जानेवारी व मार्च,२०२३ मध्ये एकूण १५ लाख सिंगल फेज व मार्च,२०२३ मध्ये २.५ लाख थ्री फेज मीटरचा पुरवठा करण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार, पुरवठादारांकडून ६.२६ लाख सिंगल फेज व २९ हजार थ्री फेज वीज मीटर महावितरणच्या क्षेत्रीय कार्यालयांना उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. तसेच, सन २०२२-२३ मध्ये एकूण ६.७० लाख व सन २०२३-२४ मध्ये आजपर्यंत १.४९ लाख नादुरुस्त मीटर बदलविण्यात आले आहेत.

---

## मुंबई जे. जे. रुग्णालय भायखळा या रुग्णालयात सोनोग्राफीसाठी आलेल्या अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याबाबत

**(४३) ६९८७९ (२७-०९-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जे. जे. रुग्णालय भायखळा मुंबई या रुग्णालयात आई सोबत सोनोग्राफीसाठी आलेल्या अल्पवयीन मुलीवर दिनांक १२ एप्रिल, २०२३ रोजी वा त्या सुमारास अत्याचार करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०१-२०२४) :** (१) व (२) जे. जे. मार्ग पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र.१३८/२०२३, कलम ३५४ (अ), ३४२ भा.द.वि.सं. कलम ८, १२ बालकांचे लैंगीक अपराधापासून संरक्षण अधिनियमान्वये अनोळखी इसमाविरुध्द दि.१०.०४.२०२३ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला असून तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कळमेश्वर (जि. नागपूर) तालुक्यातील अनेक गावांतील शेतशिवारात लटकत असलेल्या विजेच्या तारा पूर्ववत करण्याबाबत

**(४४) ७०३०९ (२७-०९-२०२३). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमेश्वर (जि. नागपूर) तालुक्यातील अनेक गावांतील शेतशिवारात विजेच्या तारा लोंबकळलेल्या असल्याने तारा तुटून जीवित अथवा वित्तहानी होण्याची शक्यता निर्माण झाली असल्याचे दि. ८ जून, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, सदरहू तालुक्यातील शेत शिवारात लटकत असलेल्या विजेच्या तारांची दुरुस्ती करण्याबाबत स्थानिक शेतकऱ्यांनी संबंधित विभागाकडे वारंवार तक्रार करूनही अद्यापही तक्रारींची दखल घेण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय;

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले , त्याअनुषंगाने आणि कळमेश्वर (जि. नागपूर) तालुक्यातील अनेक गावांतील शेतशिवारात लटकत असलेल्या विजेच्या तारा पूर्ववत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे;

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०१-२०२४) :** (१) मौजा सांवळी व वाढोणा (खु), ता.कळमेश्वर (जि. नागपूर) या गावातील शेतशिवारात ११ कृषी ग्राहकांच्या शेतात विजेच्या तारा लोंबकळण्याबाबतची तक्रार ग्रामपंचायतमार्फत महावितरण कंपनीस दि. ०३ मे, २०२३ रोजी झाली होती.

(२) व (३) बाबत,

महावितरण कंपनीमार्फत सदर तक्रार प्राप्त होताच देखभाल दुरुस्तीच्या कामांकरिता सूचिबध्द कंत्राटदारव्दारा मौजा सांवळी येथील लोंबकळलेल्या लघुदाब विद्युत तारा १८ स्पॅन सरळ करण्यात आले आहेत. तसेच, वाढोणा (खु) येथील वाकलेला १ पोल बदली करण्यात आला असून, लोंबकळलेल्या लघुदाब विद्युत तारा ३३ स्पॅन सरळ करण्यात आले आहेत.

महावितरणमार्फत पावसाळयापुर्वी विशेष मोहिम म्हणून माहे एप्रिल व मे महिन्यात वीज वाहिन्या व विद्युत प्रणालीची देखभाल व दुरुस्तीची कामे करण्यात आली आहेत. यामध्ये रोहित्रांवरील वितरण पेटयांची दुरुस्ती, लोंबकळलेल्या विद्युत वाहिन्या व्यवस्थित करणे, झाडयांच्या फांदयांची कटाई, वाकलेले व गंजलेले पोल बदलणे इत्यादी कामे करण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजा पेंढरी (ता. धानोरा जि. गडचिरोली) येथे आदिवासी माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळेत इयत्ता ८ व्या वर्गाची अतिरिक्त १ तुकडी वाढवून देणेबाबत

**(४५) ७०४७४ (०६-१०-२०२३). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा पेंढरी (ता. धानोरा,जि.गडचिरो) येथील आदिवासी विभागाच्या आश्रम शाळेत इयत्ता ८ वी ची एकच तुकडी आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत फक्त इयत्ता १ ली ते ७ व्या वर्गापर्यंत शिक्षणाची सुविधा असल्याने विद्यार्थ्यांना पुढील ८ वी इयत्तेच्या वर्गात प्रवेश घेताना एक तर आदिवासी विभागाच्या आश्रम शाळेत किंवा बाहेर कुठेतरी प्रवेश घ्यावा लागतो. हे खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी विभागाच्या आश्रम शाळेत इयत्ता ८ वी ची एकच तुकडी असल्यामुळे विद्यार्थ्यांना सदर वर्गात प्रवेश मिळत नसल्यामुळे त्यांना ८ वी इयत्तेच्या पुढील शिक्षणापासून वंचित राहावे लागत असल्याने इयत्ता ८ व्या वर्गाची किमान १ वाढीव तुकडी मंजूर करून त्यामध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा अशी मागणी तेथील नागरिकांनी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आदिवासी विकास विभागाच्या आश्रम शाळेमध्ये इयत्ता ८ व्या वर्गाची वाढीव तुकडी मंजूर करून त्यामध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश मिळावा यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (१६-०२-२०२४) :** (१) हे खरे आहे

(२) अंशत: खरे आहे.

(३) शासकीय आश्रमशाळा पेंढरी येथे इयत्ता न ८वीची एकच तुकडी असल्यामुळे इयत्ता ८ व्या वर्गाची किमान १ तुकडी वाढीव मंजुर करुन त्यामध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा अशी मागणी नागरिकांनी केलेली असल्याचे निवेदन प्राप्त झालेले नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर जिल्ह्यात शासन आपल्या दारी या उपक्रमाबाबत

**(४६) ७०४९२ (०१-०९-२०२३). श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यात शासन आपल्या दारी या उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील लाखो लाभार्थ्यांना सुमारे २१२ कोटी चा लाभ देण्यात आल्याचे माहे जून, २०२३ च्या तिसऱ्या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, जव्हार आणि पालघर येथील लाभार्थ्यांना यापूर्वी लाभ दिला असतानाही पालघर येथे शासन आपल्या दारी या शासकीय कार्यक्रमात मा. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पालकमंत्री यांच्या उपस्थित मुख्य समारंभात पुन्हा दुबार प्रमाणपत्र देण्यात आल्याने लाभार्थ्यांची संख्या वाढली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लाभार्थ्यांना प्रत्यक्षात लाभ मिळण्यापूर्वी कार्यक्रमाच्या ठिकाणी बोलविण्यात आले मात्र, कार्यक्रम संपल्यानंतर लाभार्थ्यांना कोणताही लाभ दिला नसल्याने अनेक लाभार्थी लाभ पासून वंचित आहेत, हेही खरे आहे काय ,

(४) असल्यास, या कार्यक्रमासाठी शासनाकडून कोट्यवधी रुपयांचा खर्च सभा मंडप, हेलिपॅड साठी करण्यात आला खर्च कोणत्या लेखाशीर्ष खाली करण्यात आला आहे, त्याचे थोडक्यात स्वरूप काय आहे?

**श्री. अजित पवार (२४-०१-२०२४) :** (१) अशंत: खरे आहे.

राज्यात पालघर जिल्ह्यात शासन आपल्या दारी या उपक्रमांतर्गत ६७७९७१ लाभार्थ्यांना सुमारे २१०.८१ कोटी चा लाभ माहे जून, २०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात देण्यात आला आहे.

(२ ) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) या कार्यक्रमासाठी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२३-२४ अंतर्गत इतर जिल्हा योजना (महसूली) (३४५१३१३४) या लेखाशीर्षाखाली तसेच खासदार/आमदार स्थानिक विकास कार्यक्रम या अंतर्गत असलेल्या निधीमधून निधी उपलब्ध करून देण्याबाबत तरतूद आहे. त्यानुसार खर्च करण्यात आलेला आहे.

---

## राधानगरी, भुदरगड (जि. कोल्हापूर) येथील दुधगंगा डावा उजवा कालव्यावर गाव रास्ता पूल मंजूर करण्याबाबत

**(४७) ७०५४९ (१०-१०-२०२३). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील राधानगरी तालुक्यातील कासारपुतळे, सावर्डे, सोळांकुर तसेच भुदरगड तालुक्यातील नाधवडे येथील दुधगंगा डावा उजवा कालवा तसेच कूर शाखा कालव्याच्या दोन्ही तीरावर शेती पूरक जमिनीचे क्षेत्र वाढल्यामुळे कालव्यावरुन वाहतूक वाढली असल्याचे माहे मार्च,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कालव्यावरून जुने गाव रस्ता पूल खूप जास्त अंतरावर असल्यामुळे कालव्यांवरील वाहतूक धोकादायक बनली आहे तसेच काही ठिकाणी अपघात घडलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कालव्यावरील ठिकाणी गाव रस्ता पूल मंजूरी बाबत शेतकऱ्यांनी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री यांच्या कडे दि. २१ मार्च, २०२३ रोजी लेखी निवेदाद्वारे मागणी केली आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०२-२०२४) :** (१) होय.

(२) कालव्यावरील अपघाताबाबत कोणतीही तक्रार क्षेत्रिय स्तरावर प्राप्त नाही.

(३) होय, हे खरे आहे.

(४) दूधगंगा प्रकल्पांतर्गत मुख्य कालवा व शाखा कालव्यावर क्षेत्रीय परिस्थितीनुसार आवश्यक असलेल्या तसेच लोकप्रतिनिधी यांनी मागणी केलेल्या कासारपुतळे, बोरवडे, नाधवडे व सोळांकुर या ४ पुलांच्या प्रस्तावास दिनांक २५.११.२०२२ रोजी झालेल्या कार्यकारी समितीच्या १६६ व्या बैठकीत नियामक मंडळाच्या मान्यतेस सादर करण्यास शिफारस करण्यात आली आहे. तथापी, नियामक मंडळाची बैठक होण्यास काही कालावधी लागणार असल्याने तसेच लोकप्रतिनिधींची आग्रही मागणी असल्याने प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावास शासन पत्र दिनांक ०१.११.२०२३ अन्वये नियामक मंडळाच्या मान्यतेच्या अधीन राहून मंजुरी कळविण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणतर्फे (PMRDA) जाधववाडी, सेक्टर १२ येथील सदनिकांसाठी वीज मीटर देण्याबाबत

**(४८) ७१०३५ (०३-०९-२०२३). श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे (PMRDA) जाधववाडी, सेक्टर १२ येथे परवडणाऱ्या घरांचा प्रकल्प राबवून पहिल्या टप्प्यातील तीन हजार सदनिकांचा लाभार्थ्यांना प्रत्यक्ष ताबा देण्यात आला असून देखील सदर सदनिकाधारकांना वीज मीटरसाठी स्वत: अर्ज प्रक्रिया करून कोटेशन शुल्क भरूनही ग्राहकांना अद्यापही वीज मीटर मिळाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे व महावितरणच्या अधिकाऱ्यांना संगनमत करून तीन हजार सदनिकाधारकांचे सोशल मिडीयावर वेगवेगळे ग्रुप बनवून एजंटच्या माध्यमातून पाच हजार रुपयात मीटर उपलब्ध करून देण्याबाबतच्या पोस्ट शेअर केल्या जात आहेत , हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गृह प्रकल्पातील सदनिकाधारकांनी वीज मीटरसाठी स्वत: अर्ज प्रक्रिया करून कोटेशनचे शुल्क भरूनही वीज मीटर उपलब्ध केले जात नाही तर दुसरीकडे एजंटमार्फत अतिरक्त पाच हजार रुपये भरून तातडीने वीज मीटर उपलब्ध केले बाबतच्या तक्रारी केल्या आहेत हे खरे आहे काय,

(४) असल्यास, महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गृह प्रकल्पाला भेट देऊन पाहणी केली असता कोटेशन भरूनही ग्राहकांना वीज मीटरसाठी हेलपाटे मारावे लागत असल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन महावितरणच्या वीज मीटर देण्यास टाळाटाळ करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली तसेच सदर प्रकल्पातील सदनिकाधारकांना वीज मीटर तातडीने उपलब्ध करण्या बाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०१-२०२४) :** (१) हे खरे नाही,

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (PMRDA) जाधववाडी, सेक्टर १२ येथील २५०० लाभार्थ्यांनी दि.१२.०७.२०२३ पर्यंत महावितरणकडे वीज जोडणीसाठी अर्ज केलेले आहेत. त्यापैकी २२३४ ग्राहकांना वीज जोडणीचे कोटेशन देण्यात आलेले असून, त्यामधील २१०३ लाभार्थ्यांना कोटेशनचे शुल्क भरले आहे. यापैकी, एकूण २०७९ लाभार्थ्यांना दि.१२.०७.२०२३ पर्यंत वीज जोडणी देण्यात आलेली असून, उर्वरित ग्राहकांना वीज जोडणी देण्याचे काम सुरु आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

महावितरण कंपनीमध्ये नवीन वीज जोडणी देण्याची प्रक्रिया ऑनलाईन आहे. ग्राहकाला दिलेले कोटेशन शुल्क भरण्यासाठी ऑनलाईन तसेच रोख भरणा करण्याचे पर्याय उपलब्ध आहेत. विशेष बाब म्हणून सदर प्रकल्पाकरिता भोसरी उप विभागामध्ये स्वतंत्र एक खिडकी योजनेची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यानुसार त्या लाभार्थ्यांना महावितरण कार्यालयाकडे येवून नविन वीज जोडणी अर्ज ऑनलाईन भरण्यासाठी पर्याय उपलब्ध आहे.

(४) हे खरे नाही.

महावितरणमार्फत वीज जोडणीपोटी कोटेशनचे शुल्क भरलेल्या २०७९ लाभार्थ्यांना वीज जोडणी देण्यात आली आहे.

(५) महावितरण कंपनीमध्ये नवीन वीज जोडणी देण्याची प्रक्रिया ऑनलाईन स्वरुपाची आहे. वीज मीटरचा मुबलक साठा उपलब्ध असल्याने, ग्राहकांमार्फत कोटेशन भरणा झाल्यानंतर महावितरणकडून ग्राहकास त्वरीत वीज मीटर उपलब्ध करुन देण्यात येते. तसेच, सदर प्रक्रियेत सुलभता येण्यासाठी या प्रकल्पाकरिता भोसरी उप विभागामध्ये स्वतंत्र एक खिडकी योजनेची व्यवस्था करण्यात आली असून दोन स्वतंत्र कर्मचारी नियुक्त केलेले आहेत.

---

## मुंबई उपनगरातील म्हाडाच्या १९९४ च्या ९८ अ चारकोप iv कांदिवली पश्चिम येथील व इतर हि जागतिक बँक प्रकल्पातील लाभार्थी २७ वर्ष घरच्या प्रतीक्षेत असल्याबाबत

**(४९) ७१५०४ (१४-०९-२०२३). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडाच्या मुंबई मंडळाच्या सन १९९४ च्या ९८ अ चारकोप कांदिवली पश्चिम येथील व इतर ही जागतिक बँक प्रकल्प योजनेतील भूखंड सागरी हद्द व्यवस्थापनात प्रलंबित राहिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेली २७ वर्ष या योजनेतील शेकडो लाभार्थी सातत्याने राज्य शासनाकडे पाठपुरावा करत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, आता सागरी हद्द व्यवस्थापनात केंद्र शासनाने नवीन आराखडा मंजूर केलेला आहे, त्या आराखड्यानुसार या प्रलंबित लाभार्थींना भूखंड देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे (१३-०२-२०२४) :**(१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाने सुधारीत सागरी निर्बंधाबाबत अधिसूचना जारी केलेली आहे व त्यानुसार सुधारीत सागरी निर्बंध आराखडे प्रसिद्ध केले आहेत.

सदर आराखड्यानुसार केंद्र शासनाने अधिकृत केलेल्या NCSCM या संस्थेस प्रत्यक्ष जागेवर सिमांकन करुन त्यानुसार CRZ नकाशे तयार करणेकरीता नियुक्त केले आहे. सदर संस्थेमार्फत सिमांकनाची कार्यवाही सुरु असून त्यांनी प्रारुप नकाशे सादर केले आहेत. सदर नकाशांची पडताळणी करुन संबंधित कार्यकारी अभियंतांच्या सूचनेनुसार संस्थेच्या प्रतिनिधींमार्फत स्थळ पाहणी करण्यात आली आहे. तसेच चेन्नई येथे संबंधित अधिका-यांसमवेत दि.३/८/२०२३ व दि.३०/८/२०२३ रोजी प्रत्यक्ष चर्चा करण्यात आली असून त्यानुसार सुधारणा करुन सदर नकाशे व अहवाल लवकरात लवकर सादर करण्याबाबत म्हाडाने कळविले आहे

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सुकोंडी- वाघिवणे (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथील लघु पाटबंधारे योजनेच्या बुडीत क्षेत्राच्या बाहेर असलेल्या नागरिकांच्या पुनवर्सनाबाबत

**(५०) ७४१२४ (१३-०२-२०२४). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुकोंडी- वाघिवणे (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथील लघु पाटबंधारे योजनेला सन २००९ मध्ये पुनवर्सनासहीत कामाकरिता रु.१५१५ लक्ष इतक्या रकमेची सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून अद्यापही धरणाचे काम अपूर्ण असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१२ मध्ये विमोचकाच्या गळती दुरुस्तीचे काम करुनही अद्याप गळती कमी झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेतील बुडीत क्षेत्रापैकी केवळ सुकोंडी व डौली गावातील घरांचे पुनवर्सन करण्यात आले असून अद्याप बुडीत क्षेत्राबाहेरील बाधित कुटुंबाचे पुनर्वसन करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन, विमोचकाच्या गळतीची दुरुस्ती व धरणाचे काम सत्वर पुर्ण करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (२८-०२-२०२४) :** (१) हे खरे आहे.

सदर योजनेला सन 2009 कामाकरिता 1515.65 लक्ष इतक्या रक्कमेची सुधारित प्रशासकीय मान्यता मिळाली

होती. पुनर्वसन प्रक्रिया दि. 28/07/2006 रोजी पूर्ण करण्यात आली आहे. धरणाचे मातीकाम व विमोचकाचे काम पूर्ण करण्यात आले आहे. सांडव्याचे काम पूर्ण संचय पातळीच्या सरासरी 3.00 मी. खाली कठीण खडकापर्यंत खोदकाम करण्यात आले आहे.

(२) हे खरे आहे.

सन 2012 मध्ये विमोचकाच्या दरवाजाची दुरुस्ती यांत्रिकी विभाग, अलोरे यांचेकडून करण्यात आली. मात्र गळती कमी झालेली नाही.

(३) हे खरे आहे.

बुडीत क्षेत्रातील सुकोंडी, वाघिवणे, डौली व चांदिवणे या गावातील घरांचे पुनर्वसन करण्यात आले असून बुडीत क्षेत्राबाहेरील कुटुंबाचे पुनर्वसन करण्यात आलेले नाही.

(४) प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील बाधीत कुटुंबाचे पुनर्वसन पूर्ण करण्यात आलेले आहे. प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्राबाहेरील बाधीत शेतकऱ्यांची पुनर्वसनाची मागणी माहे सप्टेंबर 2023 मध्ये आयोजित बैठकीत मा. विधानसभा सदस्य यांनी केली आहे. याबाबत जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांच्यासोबत झालेल्या बैठकीनुसार वरिष्ठ कार्यालयाकडून मार्गदर्शन घेवून पुनर्वसनाबाबत कार्यवाही प्रगतीत आहे.

धरणाचे मातीकाम व विमोचकाचे काम पूर्ण करण्यात आले आहे. सन 2020 मध्ये गळतीच्या अनुषंगाने पाईप इनसर्शन या कामास प्रशासकीय मान्यता मिळाली. परंतु सदर कामाच्या प्रशासकीय मान्यता रद्द करण्यात आल्या. यानंतर विमोचकाच्या दुरुस्तीचे अंदाजपत्रक सन 2020-21 च्या दरसूचीवर आधारित मुख्यमंत्री जलसंवर्धन योजना अंतर्गत सादर करण्यात आले. सद्यस्थितीत जलसंधारण विभागाची सामाईक दरसूची 2022-23 व प्रचलित रॉयल्टी व जी.एस.टी. तरतूद करुन अंदाजपत्रक अद्ययावत करुन सादर करण्याची कार्यवाही उपविभागामार्फत प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.